# मन
# पाखरू
# वेल्हाळ



## वैजयंती डांगे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# मन पाखरू वेल्हाळ

## वैजयंती डांगे

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# मन पाखरू वेल्हाळ

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मन पाखरू वेल्हाळ

## लेखिका : वैजयंती डांगे

पत्ता - ११, स्नोसेम अपार्टमेंट्स
जिजामाता नगर
जेलरोड नासिकरोड नासिक - ४२२१०१
मोबईल नंबर - ९९२२६२७०९६
मेल आय डी - vaijayanti62@gmail. Com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp: 9987737237

प्रकाशन : ४ नोव्हेंबर २०२१(लक्ष्मीपूजन शके १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# वैजयंती डांगे



खरं तर साहित्यिक परिचय वगैरे देण्यइतकी काही मी कोणी मोठी लेखक वगैरे नाही. पण लहानपणापासून वाचनाची आवड होती विशेषत: ऐतिहासिक पुस्तके आणि प्रवास वर्णने वाचायला आवडतात. बाबासाहेब पुरंदरे, रणजीत देसाई, शिवाजी सावंत, मीन प्रभू, पु.ल. देशपांडे हे माझे आवडते लेखक आहेत. बहिणाबाई, इंदिरा संत, मंगेश पाडगावकर, बालकवी यांच्या कविता खूप आवडतात.

उघड्या डोळ्यांनी आणि मोकळ्या मनाने समाजात वावरतांना स्त्रीयांचे अनेक प्रश्न कळत गेले. आणि मी त्यावर आणि सामाजिक प्रश्नांवर लिहीत गेले. स्टडी ॲब्रॉड कन्सल्टंट म्हणून काम करताना ऐरणीवर असलेले मुलांच्या करिअरचे प्रश्न कळत गेले. मग ते प्रश्न पण मी माझ्या लेखांमधून मांडले. सुट्ट्यांमध्ये लहान मुलांसाठी गोष्टींचे कॉलम लिहिले विशेषत: दैनिक गावकरी आणि महाराष्ट्र टाइम्स मध्ये हे लेख प्रसिद्ध झाले. इ साहित्य ने

ऑडिओ बुकची सुरवात केली तेंव्हा मी प्रथम माझ्या दोन पुस्तकांचे ऑडिओ बुक केले. आज पर्यन्त मी अभिवाचन केलेली 8 ऑडिओ बुक्स इ-साहित्य वर प्रकाशित झाली आहेत.

लवकरच हे पुस्तक पण ऑडिओ बुक स्वरुपात पण प्रकाशित होत आहे.

धन्यवाद

**वैजयंती डांगे**

# मनोगत...

अनेकदा आयुष्यात एखाद्या गोष्टीची सुरुवात होण्यासाठी काहीतरी निमित्त लागते. माझ्या बाबतीत अगदी तसंच घडलं. माझ्या मुलीची दहावीची परीक्षा झाली आणि तिच्या शाळेतील जी मुले आता दहावीत गेली होती त्यांचे पालक कुठे आणि किती क्लास लावले ? रोज किती तास अभ्यास केला ? कोणती गाईड्स वापरली असे अनेक प्रश्न घेऊन घरी येऊ लागले. मुलांची दहावी हा पालकांसाठी एवढा ऐरणीवरचा प्रश्न असतो याची मला कल्पनाच नव्हती. ते सगळं पाहून ' दहावीचा बागुलबुवा ' म्हणून मी पहिला लेख लिहिला. तो नासिकच्या स्थानिक वर्तमानपत्रात छापून पण आला. त्यावर लोकांच्या भरपूर प्रतिक्रिया आल्या. आणि तेंव्हापासून मी लिहिती झाले.

जवळपास पन्नास लेख झाल्यावर माझ्या वडिलांची खूप इच्छा होती की या लेखांचे एक पुस्तक करावे. मग मी त्या दृष्टीने अनेक प्रकाशकांना भेटले. पण एकंदर ते सगळेच खूप खर्चिक होते. शिवाय छापलेल्या पुस्तकांचे काय करायचे ? कुठे विकायची ? हा प्रश्न होताच.

आणि अचानक एक दिवस एका ओळखीच्यांकडून इ साहित्य प्रकाशन संस्थेविषयी समजले. मग मी इ साहित्य च्या श्री सुनील सामंत यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी खूप आनंदाने स्वागत केले. आणि मग माझी पहिली दीर्घ कथा ‘ मळभ ‘ इ साहित्य वर प्रकाशित झाली. एकही पैसा खर्च न करता. शिवाय आता ही पुस्तके कुठे आणि कशी खपवावीत याचे पण टेन्शन नव्हते. एकाचवेळी देशपरदेशात अनेक वाचकांपर्यंत ते पोहोचले होते. नंतर ' मनोवेध ' , हा कथासंग्रह आणि ' आधुनिक दुर्गा ' ही दोन पुस्तके प्रकाशित झाली. वाचकांचा या पुस्तकांना उदंड प्रतिसाद मिळाला. अजूनही अधुनमधून वाचकांचे फोन येतात.

अशा तऱ्हेने मी माझ्या वडिलांची इच्छा इ साहित्य च्या मदतीने पूर्ण करू शकले. त्याचे संपूर्ण श्रेय इ साहित्य प्रकाशन संस्था आणि त्यांच्या पूर्ण टीमला जाते.

मी इ साहित्य ची खूप ऋणी आहे.

इ साहित्य बरोबर माझे नाव जोडले गेले आहे याचा मला अभिमान आहे. या पुढे ही हे नाते असेच राहील याचा मला विश्वास आहे.

एखादा शब्द कधी कुठे वाचनात किंवा ऐकण्यात येतो. आणि मग मनात तो शब्द पिंगा घालतो. आणि मग त्या शब्दाच्या

अनुषंगानी मनात वेगवेगळे विचार येतात. या पुस्तकात त्या विचारांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. हे पुस्तक देखील वाचकांच्या पसंतीला उतरेल असा विश्वास आहे.

धन्यवाद

**वैजयंती डांगे**

# अर्पण पत्रिका

माझ्या प्रत्येक लेखाचा पहिला वाचक आणि समीक्षक माझा भाऊ श्री विवेक कुलकर्णी आणि तिचे आणि माझे रक्ताचे नाते नाही. आम्ही दोघी एकमेकींना प्रत्यक्ष भेटलोसुद्धा नाही पण मोठ्या बहिणीसारखी जवळची आणि माझी पहिली वाचक आणि समीक्षक श्रीमती रेखाताई साने. आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे माझ्या प्रत्येक गोष्टीत मला सहकार्य करणारे, मदत करणारे आणि नेहेमी माझ्या पाठीशी उभे रहाणारे माझे पती श्री. सुधीर डांगे या माझ्या प्रियजनांना मी हे पुस्तक मनापासून अर्पण करते.

विवेक, रेखाताई आणि सुधीर तिघांनाही धन्यवाद. तुमचे असेच प्रेम आणि पाठिंबा कायम असु देत. (तुम्ही मला वैजूच म्हणता ना)

**तुमचीच**

**वैजू**

# **मन पाखरू वेल्हाळ :** अनुक्रमणिका

1 – शब्दप्रभू
2 – वसुधैव कुटुंबकम
3 – बालपण देगा देवा
4 – पहिले प्रेम
5 – बंदिस्त
6 – उंबरा
7 – संकल्प
8 – हुंकार
9 – प्रकाश
10 – मनरंग
11 – गुढी
12 – बजेट
13 – प्रवाह
14 – कोपरा
15 – तल्लीनता
16 – उन्हाळा
17 – अभाव
18 – तारुण्य आणि नंतरचा वर्तमान
19 – विसरलेली माणसे
20– निरोप कसला घेता माझा

एऱ्हवीं तरी सहजें ।
सुखदुःख तैंचि सेविजे ।
देहजळीं होईजे ।
मासोळी जैं ॥ १४-३५१ ॥

ज्ञानेश्वरी

# शब्दप्रभू...

अक्षराला अक्षर जोडले की शब्द तयार होतो. आणि हे शब्द एका माळेत गुंफले की वाक्य तयार होते. आणि मग पुढे काव्य, महाकाव्य, लेख कथा कादंबरीची निर्मिती होते.

ज्यांची शब्दांवर हुकूमत असते, वाक्गंगा जीभेवर असते आणि जो शब्दांना प्रभू म्हणजे परमेश्वर मानतो तोच खरा शब्दप्रभू होय. अशा शब्दप्रभूंच्या हातून साहित्य क्षेत्रातील महान कलाकृती घडतात.

महर्षी व्यासांना महाकाव्य लिहायचे होते. ते लिहिण्यासाठी त्यांना अत्यंत बुद्धिमान, बैठक पक्की असणारा आणि सुंदर हस्ताक्षर असणारी व्यक्ती हवी होती. हे सर्व गुण असणारी एक व्यक्ती त्यांच्या नजरे समोर आली आणि ते सरळ गणपती समोर जाऊन उभे राहिले. आणि माझा लेखनिक हो म्हणून त्यांनी गणपतीला विनंती केली. गणपती आनंदाने तयार झाला

पण त्याने महर्षींना एक अट घातली. मी एकदा बैठक मारून बसलो की मध्ये उठणार नाही आणि थांबणार पण नाही. आणि सांगताना तुम्ही थांबलात तर मी उठून जाईन. महर्षींनी क्षणभर विचार केला आणि अट मान्य केली. व्यास उसंत न घेता सांगत गेले आणि गणपतीने उतरवून घेतले. आणि महाभारत नावाच्या महाकाव्याचा जन्म झाला. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की महर्षी व्यास हे पहिले शब्दप्रभू असावेत.

नंतर कुरूक्षेत्रावरील युद्धाचे धृतराष्ट्राला शब्दशः वर्णन करून सांगणारा संजय हा देखील शब्दप्रभूच म्हणावा लागेल. एवढ्या मोठ्या युद्धभूमीवर सुरू असलेल्या महासंग्रामाचे तंतोतंत वर्णन करणे सोपे नव्हते.

अशा शब्दप्रभूंच्या महालात सरस्वती वास करते. म्हणूनच इतक्या लहान वयात ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीची निर्मिती करू शकले. तुकारामांची गाथा, एकनाथांचे भागवत, कबीराचे दोहे, जनाच्या ओव्या हे एवढे प्रचंड साहित्य बघितले की हे सगळे संत शब्दांना परमेश्वर मानत होते याची खात्री पटते. आणि म्हणूनच शब्दांच्या माध्यमातून इतक्या महान साहित्याचा ठेवा आज आपल्याला

लाभला आहे. महान कवी, लेखकांच्या घरी सरस्वती पाणी भरते असे म्हणतात. टिळकांचे गीतारहस्य किंवा सावरकरांचे कमला हे याचे उत्तम उदाहरण आहे.

असे म्हणतात की जे न देखे रवी ते देखे कवी. कधी आपण विचारही करू शकणार नाही अशा कल्पना त्यांच्या मनात येतात. आणि कवितेच्या रूपात कमीतकमी शब्दात आपल्या डोळयांसमोर त्यांच्या मनातील कल्पनाचीत्रच उभे करतात. लेखक सुद्धा एखाद्या घटनेचे, गोष्टीचे किंवा कल्पना चित्राचे हुबेहूब वर्णन आपल्या डोळ्यासमोर उभे करतात. पुस्तक वाचताना खडा न खडा प्रसंग डोळ्यांसमोर उभा राहतो. ही सगळी शब्दांची आणि योग्य ठिकाणी योग्य शब्द निवडून चपखल बसवणाऱ्या शब्दप्रभूंची किमया असते. त्यांच्या डोळ्यांनी आणि शब्दांनी आपण जग बघू शकतो.

आपल्या राज्य घटनेने आपल्याला विचार स्वातंत्र्याचा हक्क दिला आहे. त्यामुळे राजकारण, समाजकारण, अर्थकारण या आणि अशा अनेक गोष्टींवर आपण विचार व्यक्त करतो. आजच्या काळात तर आपले विचार लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी व्हॉट्स

अप, फेसबुक, ट्विटर सारखी अनेक माध्यमे उपलब्ध आहेत. पण फार थोड्या लोकांना आपले विचार योग्य शब्दात मांडता येतात. कारण त्यांच्या विचारांवर आणि शब्दांवर त्यांची हुकुमत असते. आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा आणि आपल्याकडे असलेल्या लेखन कौशल्याचा योग्य ठिकाणी आणि योग्य कारणासाठी वापर करणे महत्वाचे असते. अशा लोकांना वाक् पटू सुद्धा म्हणले जाते. प्र.के. अत्रे, अटलबिहारी वाजपेयी, बाळासाहेब ठाकरे ही माणसे उत्तम वाक् पटू होती. शब्दांवर त्यांची पकड फार मजबूत होती.

पु.ल.देशपांडे, वसंत कानेटकर, कवी कुसुमाग्रज, बालकवी, दुर्गाबाई भागवत, ग.दि. माडगूळकर, केशवसुत अशा महान कवी आणि लेखकांच्या दारी तर शब्दगंगाच वाहते असे म्हणले तर वावगे ठरणार नाही.

नाटकात किंवा सिनेमात सुद्धा कथा आणि संवाद जरी लेखकांनी लिहिलेले असले तरी शब्दांची अचूक फेक पण महत्वाची असते. शब्दांचा अचूक भावार्थ प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे अपेक्षित असते. त्यासाठी कलाकारांचे शब्दोच्चार आणि

संवादफेक खूप महत्वाची असते. त्यामुळे एकाअर्थी त्यांना पण शब्दप्रभूच म्हणायला हवे.

महर्षी व्यासांपासून ते आत्ताच्या काळातल्या सगळ्या शब्दप्रभूंना माझा मनापासून नमस्कार आणि मानाचा मुजरा.

# वसुधैव कुटुम्बकम...

काही वर्षांपूर्वी रोजा नावाचा चित्रपट आला होता. त्यात नायकाला त्याचा बॉस ऐन वेळी आजारी पडल्याने त्याच्याऐवजी ऑफिस कामासाठी काश्मीरला जावे लागते.

(तेव्हा काश्मीर चांगलेच धुमसत होते.) नायकाचे नुकतेच लग्न झालेले असते. बॉस त्याला विचारतो तुला जायची भीती तर वाटत नाही ना? तेव्हा नायक म्हणतो काश्मीर आपल्या देशातच आहे ना!! मग आपल्याच देशात कुठेही जाण्याची भीती का वाटावी? आपल्याच घरात आपण परक्यांना का घाबरायचे?

इथे आपला देश म्हणजे आपले घरच आहे असे नायकाला सुचवायचे आहे. आणि हीच आपलेपणाची भावना संपूर्ण जगाबद्दल वाटणे म्हणजेच वसुधैव कुटुम्बकम. खरंतर या उक्तीची सुरुवात ही कुटुंबापासून होते.

जेंव्हा चार माणसं कुठल्यातरी नात्याच्या धाग्यांनी बांधुन एकत्र राहतात तेव्हा तयार होते कुटुंब. माणसाच्या आयुष्यात कुटुंबाला फार महत्व असते. पाषाण युगात मानव अगदी प्राथमिक अवस्थेत असताना सुद्धा सुरक्षा आणि विचारांचे आणि भावनांचे

आदान प्रदान करण्यासाठी त्याला सोबतीची गरज भासू लागली. आणि तो प्रथम समूहानी राहू लागला. आणि त्यातूनच पुढे कुटुंब ही संकल्पना उदयास आली. मी, माझे घर, माझे कुटुंब याची आणि त्याच्या त्या कौटुंबिक हक्कांची जाणीव त्याला झाली. म्हणजे मानवाने स्वतःभोवती स्वत:च्या अधिकाराचे प्रथम कुंपण घातले. पुढे या कुंपणाची व्याप्ती भौगोलिक भाषिक जातीय आणि धार्मिक भिंती उभ्या करण्यापर्यंत जाऊन पोहोचली.

खरंतर व्यक्तीच्या जीवनाचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे कुटुंब. आपल्या आयुष्यात घडणाऱ्या चांगल्या-वाईट घटनांचे पडसाद आपल्या कुटुंबावर पडत असतात. बाळाच्या जन्माची चाहूल लागल्यापासून त्याचा जन्म आणि पुढे त्याच्या प्रत्येक प्रगतीचे कोडकौतुक आजी आजोबा, काका काकू, मामा मामी, आत्या, मावशी असे सगळेच कुटुंबीय उत्साहाने करत असतात. कुटुंब म्हणजे प्रगतीला प्रोत्साहन आणि ढळणाऱ्या, डगमगणाऱ्या पावलांना आधार असते. बाळ मोठे होत जाते तसे कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची स्वतंत्र ओळख आणि नाते कळू लागते. कुटुंबात कधी रागाने तर कधी प्रेमाने सांगितलेल्या गोष्टीतून माणसाची जडणघडण होत जाते. एखाद्या परिस्थितीत कुठल्याही निर्णयाच्या

वेळी जर आपली दोलायमान अवस्था झाली, आपण डगमगलो तर आपले कुटुंब आपल्याला सांभाळून घेते. योग्य-अयोग्य ची जाणीव करून देते व योग्य निर्णय घेण्यास मदत करते. या सगळ्या गोष्टी आपल्याला पुढे समाजात वावरायला मदत करतात.

जेंव्हा एखादी व्यक्ती समाजात मिसळते तेव्हा समाजातील विविध प्रवृत्तींशी जुळवून घेताना त्या व्यक्तीचा खरा कस लागतो. मनातील विचारांचे भावनांचे आदान प्रदान करताना समाजाशी आपले नाते अधिक दृढ होत जाते. कुटुंब संस्थेचे व्यापक स्वरूप म्हणजेच समाज. पण ते समजून घेण्यासाठी मात्र आपला दृष्टिकोन व्यापक हवा. हा दृष्टिकोन प्रथम ज्ञानेश्वरांनी वसुधैव कुटुम्बकम या उक्तीतून समाजासमोर मांडला.

आज-काल आपण वेगवेगळे दिवस साजरे करतो. तसेच जागतिक कुटुंब दिन साजरा करताना भारतासारख्या देशात ज्यांनी विश्वबंधुत्वाची संकल्पना सर्वप्रथम मांडली त्या संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचे अवलोकन आपण केले तर लक्षात येईल की विश्वा एवढ्या व्यापक अंत:करणाने विश्वात्मक देवाजवळ विश्व कल्याणाचे पसायदान ज्ञानदेवांनी मागितले. या पसायदानातील

भावार्थ जाणून जर प्रत्येकाने हे दान मागितले तर वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होताना आपल्याला दिसेल. ज्यात धर्म जात पंथ आणि भौगोलिक सीमा सुद्धा ओलांडल्या गेल्या असतील. मनानी एकरूप झालेल्या या विश्वात हिंसाचार दहशतवाद अराजकता विध्वंस या कुप्रवृत्तींचे समूळ उच्चाटन होऊन हे विश्वची माझे घर हा भाव प्रत्येक व्यक्तीच्या मनात नांदताना दिसेल

हे सगळे बोलायला किंवा लिहायला खूप सोपे आहे. पण प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी मात्र प्रत्येकाला संत व्हावे लागेल आणि ते अजिबात सोपे नाही. किंबहुना अशक्यप्राय आहे.

अख्या विश्वाचा विचार करण्याआधी आपण सर्वप्रथम सगळी नाती गोती, सगेसोयरे, शेजारीपाजारी, सहकारी या सगळ्यांना एका बंधुत्व भावनेत बांधण्याचा प्रयत्न मात्र नक्कीच करू शकतो

शुभम भवतु

# बालपण देगा देवा

वैजू अग किती उशीर? किती वेळा तुला सांगायचं लवकर घरी येत जा म्हणून?

चल, आता पटपट हातपाय धू आणि शुभंकरोती म्हणून अभ्यासाला बैस. गृहपाठ काय आहे आज? आई एकामागून एक हुकूम सोडत होती. मी म्हणाले, "हो करते ग बाई, किती मागे लागतेस सारखी. एकतर आधीच भूक लागली आहे. पोटात कावळे ओरडतायत नुसते." आई म्हणाली, "गृहपाठ करून जेवायला ये. जेवण तयार आहे. मी सांगितले होते का इतक्या उशिरा पर्यंत खेळायला?" खेळताना बरी भुकेची आठवण येत नाही ती!!! कसाबसा गृहपाठ संपवून जेवायला आले , पहाते तर समोर संकट उभे होते, ' वांग्याची भाजी '. मला अज्जिबात आवडत नाही. मी मोठी झाले की कध्धी म्हणून वांगी आणणार नाही असे पुटपुटत कसेबसे जेवण केले. खरतर टेबलवर पडलेला आजच आलेला किशोरचा ताजा अंक केंव्हाचा खुणावत होता . पण........

जेवण झाल्याबरोबर आईने गणिते करायला बसवले. उद्या परीक्षा होती ना!! शेवटी सगळ आवरून दप्तर भरून एकदाची झोपले.

दुसऱ्या दिवशी शाळेत गणिताचा तास सुरु झाला. बाई आल्या. त्यांनी पटापट गणिते फळ्यावर लिहुन दिली. मला अचानक काही आठवेना, एकही गणित येईना. अगदी घाम फुटला. बाईंनी विचारले काय वैजू येतायत ना गणितं? कशीबशी हो म्हणत उभी राहिले. आणि....... आणि अचानक जाग आली पाहते तर काय हे सगळे स्वप्न होते

लाईट गेल्याने एसी बंद झाला होता आणि शरीर घामानी थबथबले होते . घड्याळात बघितलं तर उठायची वेळ झालीच होती. वेळेवर नाही उठलं तर ऑफीसला उशीर मग लेटमार्क, बॉसची नजर आणि बरच काही..... पटकन उठून कामाला लागले. चहाचे आधण ठेवले , कुकरची तयारी केली. सवयीनी हात पटापट आवरत होते. पण मनात सारखा विचार येत होता शाळा संपून जवळपास तीस वर्षे झाली आणि आता हे स्वप्न का पडलं? मग आठवलं घर - ऑफीस - घर , अशी रोज तारेवरची कसरत करताना काल अचानक दहा मिनिटे बोनस मिळाली होती म्हणून येताना मंदिरात पाच मिनिटे टेकले. समोर ग्राउंडवर मुलांचा खेळ रंगात आला होता. ते पाहून मला माझे लहानपण आठवले. आमच्या कॉलनीत खूप मोठे ग्राउंड होते. आम्ही खूप खेळायचो. लगोरी ,

विट्टी दांडू , लंगडी खूप मजा यायची. क्षणभर वाटले पुन्हा लहान होऊन ते निरागस अल्लड वय पुन्हा अनुभवावे . आणि देवाला हात जोडून म्हणले लहानपण देगा देवा | मुंगी साखरेचा रवा ||

तुकाराम महाराजांच्या अभंगातल्या या ओळी आपण अनेकदा म्हणतो . कुणी दोन जुने मित्र भेटले की लहानपणीच्या आठवणी हमखास निघतातच. आणि मग खरच काय मस्त होतं रे ते आयुष्य, खावे, प्यावे , खेळावे आणि जमेल तसा आणि तेंव्हा अभ्यास करावा. आणि मग पुन्हा एकदा बालपण जगायला मिळावे . त्या वेळी केलेल्या गमती जमती , धमाल मस्ती पुन्हा करता यावी या विचाराच्या नोट वर तो विषय संपतो.

अनेकदा मुले ग्राउंडवर खेळताना पाहिली की आपल्या जबाबदारीचे ओझे फेकून देऊन लहान होऊन त्यांच्यात जाउन खेळावेसे वाटते. कधीकधी पहाटे उठून आवरून ऑफीसला जाणे जीवावर येते आणि त्याचवेळी साखरझोपेत असलेल्या आपल्या मुलाचा हेवा वाटतो आणि पुन्हा लहान व्हावेसे वाटते . पांघरुणात गुरफटून झोपावेसे वाटते.

मग मला प्रश्न पडतो की आपल्याला खरच आपले लहानपण परत हवे असते का? की त्यावेळेसचा निरागसपणा, जबाबदारी नसलेले स्वच्छंद आयुष्य आपल्याला भावते, आवडते?

आज आपण स्वतंत्र आहोत . कुठल्याही गरजेकरता कुणावर अवलंबून नाही . कुठलीही गोष्ट करायला कुणाच्या परवानगीची गरज नसते. आपले निर्णय आपण घेत असतो. नकळत आपल्याला या स्वातंत्र्याची सवय झालेली असते. या वयात आपण संसार, मुले, नोकरी व्यवसाय आणि त्यातल्या जबाबदाऱ्या हे सगळ आपल्याला हवे असते म्हणूनच स्वीकारलेले असते . आज जी सुखे, स्वातंत्र्य आपण उपभोगत असतो ती आपल्याला नको आहेत का? खर तर लग्नानंतर एकदा मुल झाले की संसार मार्गी लागतो. मग प्रमोशन मिळाले, स्वतःचा बंगला झाला, गाडी झाली की आपल्याला सुखाच्या शिखरावर असल्याचे जाणवते. या सुखाच्या शिखरावर असताना तर कधीच आपल्याला पायी वणवण फिरलेले किंवा सायकलवर फिरलेले आपले बालपण आठवत नाही . त्या पायी फिरण्यात किंवा सायकलवर फिरण्यात मजा होती असे कुणालाही वाटत नाही. आणि कुणी गाडी घरी ठेऊन पायी किंवा सायकलवर ऑफिसला जात नाही.

आता लहानपण म्हणले की प्रत्येक निर्णयासाठी मोठ्यांवर अवलंबणे आले. शाळा, अभ्यास, परीक्षा, गृहपाठ, नावडते विषय हे पण सगळे आलेच. या प्रत्येक वेळी मात्र आपल्याला वाटत असते की कधी एकदा मोठे होऊ आणि या सगळ्या कष्टांतून आपली सुटका होईल. खेळ अगदी रंगात आलेला असतो आणि आईची हाक आली की नाईलाजाने खेळ सोडून घरी जाऊन अभ्यासाला बसावेच लागते. त्यावेळी खेळ पूर्ण न झाल्याचे त्या वयाचे दुःख असते. कधी हवेहवेसे पाहुणे येतात. त्यावेळी शाळा बुडवावीशी वाटते. पण आईमुळे शाळेत जावेच लागते. त्यावेळी मनासारखे न वागता आल्याचे दुःख असते. म्हणजे बालपणातल्या जबाबदाऱ्या, दुःख यांचा त्रास त्या त्या वयात होतोच. प्रत्येक गोष्टीकरता दुसऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. म्हणून मग त्या वयात कधी एकदा मोठे होऊ असे वाटत असते. अनेकदा "एवढा मोठा झालास तरी कळत नाही"? तर कधी तू अजून लहान आहेस तुला नाही कळणार" असे इकडून तिकडे टोलवले जाते. नेमके आपण लहान आहोत की मोठे तेच काळत नाही. फक्त कनफ्यूजन वाढत असते. नेमके कसे वागावे तेच कळत नाही. त्यावेळेला आपल्याला लहानपण आवडत नाही. आई बाबांचा , ताई दादाचा हेवा वाटत असतो.

लहान मुलांना सुद्धा आनंद, राग, दुःख या भावना असतातच. त्या वेळोवेळी प्रकटही होत असतात. आई रागावली की अगदी छोटी मुले सुद्धा रडतात, चिडतात, रागावतात आपल्या भावना व्यक्त करून मोकळी होतात. आणि थोडावेळ गेल्यावर सगळे विसरून तितक्याच प्रेमाने आईला बिलगतात सुद्धा. खरे तर हा निरागसपणाच मोठ्यांना भुरळ घालत असतो.

मग माणसाला नक्की काय हवे असते? मला वाटते आपल्याला कोणत्याही वयातल्या त्रासदायक, कदाचित न झेपणाऱ्या जबाबदाऱ्या नको असतात. आणि मग त्या पार पाडताना होणारी दमछाक आणि तरीही नाईलाजाने त्या पार पाडाव्या लागतात तेंव्हा आपल्याला लहान किंवा मोठे व्हावसे वाटत असते.

मग लहानपण हवे म्हणजे नेमके काय हवे असते? मला वाटते ते निरागस, लवचिक मन हवे असते. लहान मुले अपमान वगैरे फार लवकर विसरतात तसेच आपल्याला पण गोष्टी विसरून पुन्हा आयुष्याला तितक्याच उमेदीने सामोरे जाता आले पाहिजे. वाट्याला आलेले अपमान, अपयश पचवता आले पाहिजेत आणि

ते विसरून किंवा मागे टाकून पुढे जाता आले पाहिजे. लहानपणी सारखे छोट्या छोट्या गोष्टीत आनंद घेता आला पाहिजे. म्हणूनच

***लहानपण देगा देवा***
***मुंगी साखरेचा रवा***

# पहिले प्रेम...

*वाट पाहुनी जीव शिणला*
*दिसा मागुनी दिस टळला*

*सुर्व्या आला तळपून गेला*
*मावळतीच्या खळी गालाला*

*कुटं गुंतला शब्द इसरला*
*देऊन अपुल्या सजणीला*

कधी येशील रे! किती वाट पहायला लावतोस! नेहेमीचेच आहे हां हे तुझे. तुझ्या येण्याची थोडीशी जरी चाहूल लागली की मी तुझ्या भेटीच्या ओढीनी अगदी हरखून जाते. डोळ्यात प्राण आणून तुझी रोज वाट पाहत असते. आणि तू? तू फक्त येतो येतो म्हणून हुलकावण्या देत रहातोस. तुला माहिती आहे ना! मी तुझी किती आतुरतेने वाट पाहत असते ते. पण तू काही ठरल्या वेळी येत नाहीस. पूर्वी कसं अगदी ठरल्या दिवशी तू यायचासचं. पण हल्ली मात्र खूप वाट पाहायला लावतोस. नुसतंच म्हणायचं माझं तुझ्यावर प्रेम आहे म्हणून, पण कधी कधी वाटतं मला जितकी तुझ्या भेटीची ओढ असते ना तितकी तुला नसतेच मुळी. मी अस्वस्थपणे येरझाऱ्या घालत दिवस मोजत असते आणि तू मात्र दर आठ

दिवसांनी पुढचा वायदा देत राहतोस. कधी कधी तर माझ्या डोळ्यांतली तुझ्या भेटीची ओढ मावळायला लागते. मनीचा मोरपिसारा पंख मिटून घ्यायला लागतो. आणि मग मी "ये रे घना ये रे घना न्हाऊ घाल माझ्या मना"

म्हणत उदास होऊन तुझी विनवणी करायला लागते. आता मात्र माझा धीर अगदी सुटत चाललेला असतो.

पण खरे सांगू का माझे तुझ्यावर इतके प्रेम आहे की तुझे हे मला असे छळणे पण मला आवडते. कारण मला माहिती आहे की तुझे ही माझ्यावर तितकेच प्रेम आहे.

आणि अचानक तुझ्या येण्याची बातमी घेऊन ' ती ' येते आणि तू येत आहेस असे सांगून लखकन चमकून जाते. नाही नाही मला तुझ्या येण्याचा भास तर होत नाहीये ना! खरंच का तू येतो आहेस? तुझ्या येण्याची चाहूल तर लागते आहे पण हा भास तर नाही ना!!! पुन्हा तिने तू येतो आहेस हे अगदी ठासून संगितले . आता मात्र नक्कीच तू.....

हो हो तूच येतो आहेस. तुझ्या भेटीच्या ओढीने मी हुरळून गेले. वेड्यासारखी भान विसरून धावत अंगणात आले. आणि.........

आणि दूर क्षितिजावरून तू येतांना दिसलास. मी हरखून गेले. माझ्या मनीचा मोर थुई थुई नाचू लागला. मला बघून तू पण तुझी गती वाढवलीस. तुझ्या वाढलेल्या गती वरून धावत येऊन मला मिठीत घेण्याची तुझी ओढ मला जाणवते आहे. ये रे धावत ये आणि मला घट्ट मिठीत घे. तुझ्या प्रेमाच्या सहस्र धारांनी मला अगदी चिंब भिजवून टाक.

तू अगदी जवळ आला आहेस. टप... टप... तुझ्या घोड्यांच्या टापांचा आवाज जवळ जवळ येतो आहे. भालदार चोपदर ललकारी देत आहेत. तुझी चाहूल माझा रोम रोम फुलवते आहे. त्या सुखाच्या कल्पनेने माझे डोळे गच्च मिटले आहेत. आणि क्षणात तू हळुवार हातांनी मला जवळ घेतलंस. आणि माझ्या कानात कुजबुजलास " डोळे उघड ना, बघ मी आलोय. तुझ्या साठी."

मी - उंहुं

"असं काय? उघड की डोळे. पहा तरी माझ्याकडे. एवढ्या लांबून फक्त तुझ्यासाठी आलो आहे. बघ ना. "

मी - " नको रे माझ्या सुखाला माझीच नजर लागेल. "

आपल्या प्रेमाच्या सहस्त्र धारांनी त्याने मला चिंब चिंब भिजवून टाकले. त्याच्यावरचा राग रुसवा सगळे सगळे क्षणात धुवून टाकले त्याने. तो आला की माझे मन मोरपिसा सारखे हलके होते. मयूरपंख लेवून मी आनंदानी नाचू लागते. आणि कंठातून मुक्त स्वर उमटतात

घन घन माला नभी दाटल्या कोसळती धारा.

आणि मी अगदी तृप्त तृप्त होते. वेळाकाळाचे भान विसरून चिंब चिंब भिजत राहते. अगदी मनसोक्त, मन भरे पर्यंत. तो पण मला भिजवत रहातो. पूर्ण रिकामा होई पर्यन्त.

होय अगदी बरोब्बर ओळखलंत. मृगात कोसळणारा पहिला पाऊस हे माझे पाहिले प्रेम आहे. अगदी लहानपणापासून मला त्या पहिल्या पावसाचे प्रचंड वेड आहे. आज पन्नाशी उलटून गेली तरी पहिल्या पावसात भिजायचे वेड थोडे सुद्धा कमी झालेले नाही.

त्याचे येणे अगदी कसे रुबाबदार असते. ते सोनेरी किनार असलेले गच्च दाटून आलेले काळेभोर आभाळ, मधूनच लखकन चमकणारी वीज, सुरवातीला हळुवार पावलांनी त्याचे येणे, आसमंतात मृदगंधाची होणारी उधळण, चराचर सृष्टीने आलेली

मरगळ झटकून त्याच्या स्वागताला सज्ज होणे, आणि घरातल्या सगळ्यांची नजर चुकवून माझे अंगणात जाऊन उभे राहणे. आणि पुढच्याच क्षणी त्याचे प्रपाता सारखे कोसळणे. सगळंच किती देखणं असतं. अगदी वेड लावणारं असतं. त्याच्या त्या मिठीतल्या सुखाची सर कश्शा कश्शाला नाही. तो येतो, मुक्त हस्ते प्रेमाची आनंदाची, समृद्धीची उधळण करतो. आणि रिक्त होऊन माघारी वळतो. पुन्हा पुढच्या वर्षी वेळेवर येण्याचा वायदा करून.

मग त्याच्या प्रेमाच्या समृद्धीच्या खुणा अंगावर लेवून माझे मन गात रहाते.

***चिंब पावसानं रान झालं आबादानी***
***झाकू कशी पाठीवरली चांदणं गोंदणी***
***झाकू नको कमळंनबाई, एकांताच्या कोनी***
***रुपखनी अंगावरली सखे लावण्याची खाणी***

# बंदिस्त...

***मुक्ता मधला मुक्त मी |कैद्यां मधला कैदी तू ||***

दोन जन्मठेपांची शिक्षा भोगण्यासाठी सावरकरांची अंदमानच्या अंधारकोठडीत रवानगी झाली. शरीर जरी बंदिस्त होते तरी मन मात्र मुक्त होते. भयानक शिक्षा भोगत असताना, हातात काही नसताना, भिंत कागद झाली दगड खडू झाला आणि त्या बंदिस्त कारागृहात एक अजरामर महाकाव्य जन्माला आले.

ज्ञानेश्वरां नंतर भिंत पुन्हा एका साठी चालली.

बंदिस्त म्हणजे बंधन किंवा बद्ध करणे, डांबून ठेवणे. एखादी वस्तू जर जोर देऊन दाबून ठेवली तर त्यावरचा दाब जरा कमी होताच ती दुप्पट वेगाने वर उसळून येते. हा भौतिकशास्त्राचा नियम आहे.

मोठी मोठी धरणे बांधून पाणी साठवले जाते. धरणाच्या भिंती मागे प्रचंड मोठा जलसाठा असतो. पण कधी धरणाला भगदाड

पडले तर मात्र काय होते हे पानशेत चे धरण फुटले तेव्हा सगळ्यांनीच अनुभवले आहे. वर्षानुवर्ष थोपवून धरलेल्या पाण्याने रौद्र रूप धारण केले. आणि बघता बघता अख्खे पुणे पाण्याखाली गेले. होत्याचे नव्हते झाले.

माणसाचे पण असेच असते. त्याच्यावर जेवढी जास्त बंधने लादली जातील तेवढा तो त्यातून सुटायचा प्रयत्न करतो. बंधने झुगारून देण्याचा प्रयत्न करतो. बरेचदा मुलींवर घरातून अनेक बंधने लादली जातात जसे तिकडे जाऊ नकोस, त्याच्याशी बोलू नकोस, हे करू नकोस आणि ते करू नकोस, असे कपडे घालू नकोस, सातच्या आत घरात ये वगैरे वगैरे.....

पण मुलींना मात्र स्वच्छंद आयुष्य हवे असते. आकाशात उंच भरारी घ्यायची असते. अनेक गोष्टी करायच्या असतात. अनुभवायच्या असतात. मग अशावेळी घरातून टाकलेली ही बंधने जाचक वाटू लागतात आणि मग त्यातून मुक्त होण्यासाठी घरातल्यांना फसवणे, खोटे बोलणे, घरातून पळून जाणे, आपल्याच घरात चोरी करणे असे गैरमार्ग अवलंबून बंधनातून मुक्त होण्याचे प्रयत्न केले जातात.

बंदिस्त किंवा बंदिवान होणं कुणालाच आवडत नाही. मुक्त, स्वच्छंद, स्वातंत्र्य सगळ्यांनाच हवे असते. म्हणूनच भारत माता पारतंत्र्याच्या शृंखलेत अडकली होती, बंदिस्त होती तेंव्हा तिला मुक्त करण्यासाठी, स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक क्रांतिवीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली होती. म्हणूनच आपण स्वतंत्र भारतात जन्मलेले नागरिक स्वातंत्र्याची फळे चाखत आहोत. इंग्रजांनी भारतीयांवर अनेक जाचक बंधने टाकली होती शेवटी एकजुटीने भारतीयांनी इंग्रजी सत्ताच उलटून टाकली.

सोन्याच्या पिंजऱ्यात ठेवून मोत्याचा चारा घातला तरी तो पक्षी सुखी किंवा आनंदी नसतो. त्याला त्याच्या सहकाऱ्यांबरोबर आकाशात उंच भरारी घ्यायची असते गगनाला गवसणी घालणं त्याला आवडतं. तो पिंजऱ्यातून सुटण्यासाठी धडपडत असतो. कारण त्यालासुद्धा स्वातंत्र्याचे महत्त्व माहिती असते

पुलवामा हल्ल्यानंतर एक एक जवान पेटीत बंदिस्त होत होता आणि भारतीयांचे अश्रू मात्र मुक्तपणे वाहत होते.

पूर्वी चीन जपान स्पेन अशा काही देशात बंदिस्त अर्थव्यवस्था होती. जेव्हा बाहेरील इतर देशांबरोबरच्या आयात-निर्यातीला बंदी असते तेव्हा तिला बंदिस्त अर्थव्यवस्था असे म्हटले जाते. त्यामुळे

देशाची आणि पर्यायाने देशवासीयांची प्रगती खुंटते. जे देश मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करतात त्यांची प्रगती मात्र झपाट्याने होते.

स्वेच्छेने स्वीकारलेली बांधिलकी मात्र बंदिस्त करून टाकत असली तरी अपरंपार सुख देऊन जाते. संतांनी स्वतःला पांडुरंगाच्या भक्तीत बांधून घेतले होते. भक्तीत तल्लीन होऊन तहान भूक विसरून जात होते. म्हणूनच त्यांना भक्तीचे बंधन जाचक न वाटता आनंदाचे हवेहवेसे वाटत होते. लग्न झालं की नवपरिणीत वधू वर लग्नाच्या बंधनात अडकतात. ते बंधन हवेहवेसे वाटत असते. समाजात कौतुकाने मिरवले जाते. तसेच स्त्री जेव्हा पहिल्यांदा आई होते आणि बाळाचा पहिला स्पर्श होताच ती नैसर्गिकरित्या मातृत्वाच्या बंधनात अडकते. हे बंधन सुद्धा कधीच जाचक होत नाही उलट ते अभिमानाने मिरवले जाते. अशा नात्यांचे नाजूक रेशमी बंध तोडायचे म्हटले तरी तुटत नाहीत.

आयुष्यात भक्तीचे मायेचे प्रेमाचे संस्कारांचे आणि अशी अनेक बंधने आपण स्वेच्छेने स्वीकारतो आणि आनंदाने ती बंधने शेवटपर्यंत निभावतो. पण जी बंधने लादली जातात, नाईलाजाने

स्वीकारावी लागतात तेव्हा मात्र जीवाच्या आकांताने ती बंधने तोडून टाकण्याचा माणूस प्रयत्न करतो.

प्राणी पक्षी माणूस सगळयांनाच मुक्त स्वच्छंद आयुष्य जगण्याचा अधिकार निसर्गाने आणि कायद्यानेही दिला आहे म्हणून पक्ष्यांना पिंजऱ्यात कोंडू नका मोकळया उंच आकाशात विहार करू द्या. प्राण्यांना जंगलात मुक्त संचार करू द्या. माणसावर पण जाचक होतील अशी बंधने टाकू नयेत. सुरक्षेसाठी संस्कृती रक्षणासाठी सामाजिक न्याय आणि अर्थव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी कायद्याची बंधने हवीतच. कुठेही समाजातील कुठल्याही स्तरावरील लोकांचे जगणे असह्य होईल अशी जाचक बंधने नकोतच.

आयुष्यात कितीही स्वातंत्र्य मिळालं तरी शेवटचं मृत्यूचं शाश्वत बंधन मात्र टाळता येत नाही. जे शाश्वत असते सत्य आणि सुंदर असते. त्यामुळे ते टाळण्याचा प्रयत्न न करता त्याला हसत मुखाने सामोरे गेले तर पुढचा मार्ग अधिक सुखकर होतो. हे बंधन सुंदर होण्यासाठी फक्त ईश्वर भक्तीच्या अधिष्ठानाची आवश्यकता असते.

# उंबरा...

उंबरा, उंबरठा, सीमा, मर्यादा असे अर्थ स्पष्ट करणारा हा शब्द.

उंबरा म्हणजे दाराच्या चौकटीत खालच्या बाजूस बसवलेली लाकडी पट्टी. पण हल्ली मार्बलचे किंवा शहाबादी फरशीचे उंबरे असतात. साधारणत: जुन्या वाड्यात लाकडी उंबरे पहायला मिळतात. नववधू साठी हा उंबरा खूप महत्वाचा असतो. उंबऱ्यावरचे माप ओलांडून नववधूचा गृहप्रवेश होतो. तीच्या पावलांनी घरात धनधान्य, समृद्धी येते असा एक सार्वत्रिक समज आहे. गावातले एकुण उंबरे मोजले की तितकी घरे गावात आहेत हा हिशेब मांडला जातो. पुर्वी रूढी परंपरेने लाकडी उंबऱ्याला पैशांची नाणी ठोकली जायची (ही नाणी मी फक्त पाहिली आहेत पण का ठोकतात हे कुणाला माहिती आहे का) एखाद्या मुलीच्या लग्नासाठी खूप स्थळे बघावी लागली तर ' हिच्या लग्नासाठी शंभर उंबरे झिजवावे लागले ' असं म्हणलं जातं. कुणाची वाट पहात असू आणि त्या व्यक्तीला यायला उशीर होत असेल तर उंबऱ्यावर फुलपात्र पालथे घातले जाते. पूर्वीच्या काळी लहानपणापासूनच मुलींना शिकवले जाई की एकदा का सासरचा उंबरा ओलांडून घरात प्रवेश केला की बाहेर पडायचे ते तिरडी वरूनच.

असे अनेक समज-गैरसमज उंबरा या शब्दाच्या अनुषंगाने आठवले.

उंबरा ओलांडून आत येणे जसे महत्वाचे तसेच उंबरा ओलांडून बाहेर जाणे सुद्धा महत्वाचे. किंबहुना मला वाटते उंबरा ओलांडून बाहेर जाणे जास्त महत्वाचे.

सगळ्यात प्रथम लक्ष्मणानी मारलेली लक्ष्मण रेखा (सीमा) सीतेने ओलांडली आणि रामायण घडले. राम रावण युद्ध झाले. धृतराष्ट्राने राज्याच्या मोहापायी नात्यांच्या कर्तव्याच्या सीमा ओलांडल्या आणि महाभारत घडले. अर्थात सीमा ओलांडल्याने प्रत्येक वेळी युद्ध होतात असे नाही.

आनंदीबाई जोशींनी तर शिक्षणासाठी पार देशाच्या सीमा ओलांडल्या आणि देशातली पहिली महिला डॉक्टर हा सन्मान मिळवला. जिजाऊंनी शहाजी राजांच्या राजवाड्याचा उंबरा छोट्या शिवबाला घेऊन ओलांडला व पुण्यात आल्या म्हणूनच मराठ्यांचे स्वराज्य स्थापन झाले. झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी स्वतःच्या राज्याचे रक्षण करण्यासाठी परंपरांचा उंबरा ओलांडून

हातात तलवार घेऊन इंग्रजां विरुद्ध उभी राहिली. सावित्रीबाईंनी रूढींचा उंबरठा ओलांडून स्त्री शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला म्हणूनच आजची स्त्री स्वाभिमानाने आणि ताठ मानेने उभी आहे. स्वावलंबी झाली आहे. साधारण पन्नास ते साठ च्या दशकात संसाराची गरज म्हणून स्त्री उंबरा ओलांडून नोकरीसाठी घराबाहेर पडली. आणि आज तिने कर्तृत्वाच्या सगळ्या सीमा पार करून आकाशाला गवसणी घातली आहे. म्हणून असे वाटते की कर्तृत्व गाजवायचे असेल तर उंबरा ओलांडणे महत्वाचेच आहे.

मग फक्त स्त्रीनेच उंबरा ओलांडणे विशेष आणि वेगळे होते का? फक्त स्त्रियांचीच उदाहरणे का दिली जातात? पुरुषांचं काय?

तर पुरुषांनी उंबरा ओलांडून बाहेर जाणे हे पौरुषाचे, कर्तृत्वाचे लक्षण मानले जाते. अर्थात शिवाजी महाराज राणा प्रताप सिंह आणि पुढे अनेक स्वातंत्र्यसैनिक यांनी वेगळ्या ध्येयाने प्रेरित होऊन उंबरे ओलांडले म्हणून आज आपण स्वतंत्र भारतात मोकळा श्वास घेत आहोत. त्यांच्या या कर्तृत्वाला लाख लाख प्रणाम. आणि उलट स्त्रीने उंबऱ्याच्या आत रहाणे हे मर्यादेचे आणि घरंदाजपणाचे लक्षण मानले जाई. म्हणूनच स्त्रीचे उंबरा ओलांडून

आकाशाला गवसणी घालणे जास्त महत्त्वाचे आहे असे मला वाटते.

गंगाबाई पलुस्कर एक अशी व्यक्ती, जिला नाईलाजाने उंबरा ओलांडावा लागला. ज्या काळात घरंदाज बाईने गाणे म्हणणे पाप मानले जाई त्या काळात स्वतः उंबऱ्या बाहेर पडल्या पण संगीताला घरंदाजपणाचा बाज दिला आणि घरंदाज उंबऱ्यांच्या घरात शास्त्रिय संगीताला मानाचे स्थान मिळवून दिले. आज अशा कितीतरी महिलांची उदाहरणे देता येतील ज्यांना नाईलाजाने उंबरठा ओलांडावा लागला पण पुढे जाऊन त्यांनी आकाशाला गवसणी घालणारे काम करून स्वतःला सिद्ध करून दाखवले. अशा स्त्रीयांना शतशः प्रणाम

आज स्त्रीने उंबरा ओलांडण्यात काही नाविन्य राहिले नाही. पण अनेक मुली कुठलाही विचार न करता काहीतरी वेडे स्वप्न उराशी घेऊन आई-वडिलांना न जुमानता घराबाहेर पडतात. आणि अनेकदा अशा मुलींचा गैरफायदा घेतला जातो आणि त्या चुकीच्या मार्गाला लागण्याची मोठी शक्यता असते. उंबरा ओलांडल्यावर समोर दहा वाटा असतात. पण त्यातील एखादीच

वाट यशाच्या शिखराकडे जात असते. तेंव्हा विचारपूर्वक योग्य वाट निवडणे महत्वाचे असते. नाहीतर हकनाक बळी जाण्याची पण शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच काळ कितीही बदलला तरीही स्त्रीने उंबरठा ओलांडतांना सर्व परिस्थितीचा सारासार विचार करूनच ओलांडावा असे सांगावेसे वाटते.

# संकल्प ---------

डिसेंबर उजाडला की सगळ्यांनाच नवीन वर्षाचे वेध लागतात. नवीन वर्ष म्हणजे प्रथम मनात विचार येतो तो म्हणजे संकल्प. व्हाट्सअप, फेसबुक, मित्र मैत्रिणी सगळीकडे एकच चर्चा असते. ती म्हणजे नवीन वर्षात काय संकल्प करायचा याची. जो भेटतो तो विचारतो, "नवीन वर्षाचा काय संकल्प करणार "? कधी कधी तर असे वाटते की नववर्षाचा संकल्प नाही केला तर मला जेल होईल बहुतेक आणि कदाचित नवीन वर्ष उजाडणारच नाही.

या वर्षी काहीतरी नवीन संकल्प करण्याचा संकल्प मी केला होता. दर वर्षी वजन कमी करणे हा एकच संकल्पाचा अजेंडा असायचा माझा. पण काय संकल्प करावा हेच सुचत नव्हते. संकल्प करणे म्हणजे काय सोपी गोष्ट आहे का? संकल्प म्हणून एखादी गोष्ट करावी असा विचार करायला गेले तर त्या आधी त्यात येणारे अडथळेच आठवतात. आणि मग तो संकल्प बारगळतो. असे अनेक पर्याय शोधून झाले पण एकही संकल्प वर्षभर पार पाडता येईल असे मला वाटत नव्हते. कुठे मला दुपारची शान्तसुखाय झोप सोडावी लागणार होती. आता तुम्हीच बघा

सकाळी उठल्यावर नवऱ्याला आणि मुलांना डबे देऊन त्यांची रवानगी केली की मग स्वतः साठी चहा करावा लागतो मग पेपर मधल्या सेलच्या वगैरे जाहिराती वाचाव्या लागतात. मधेच उठून शांताबाई साठी दार उघडावे लागते. मग दुपारी कधी भिशी , कधी वाढदिवस कधी केळवण, डोहाळजेवण तर कधी शॉपिंग असे कुठे ना कुठे जायचे असते मग त्यासाठी आधीच कपडे, मॅचिंग गळयातले कानातले, पर्स वगैरे तयारी करून ठेवावी लागते मग जेवण झाल्यावर टीव्ही बघता बघता डोळे कधी मिटतात कळतच नाही. सकाळी उठल्यापासून इतकी कामे करून थकल्यावर झोप तर येणारच ना!! असे काही ना काही कारणाने एक एक संकल्प रद्दबातल होत गेला. शेवटी कोणता नवा संकल्प करावा हा प्रश्न ऐरणीवरच राहिला. मग कोण कोण काय काय संकल्प करतायत बघावे म्हणून सहजच फेसबुकात आणि व्होटसापात डोकावून बघितले तर काय? बापरे!!! काय काय संकल्प केले होते कुणी कुणी. एकीने तर चक्क या वर्षभरात एकही नवीन ड्रेस किंवा साडी घेणार नाही असा संकल्प केला होता. अहो पण सेल मध्ये साड्या, कपडे घेऊन नवऱ्याचे पैसे वाचवणे आणि काटकसरीने संसार करणे हे सगळ्या बायकांचे प्रथम कर्तव्य असते असे माझे प्रामाणिक मत आहे.

संध्याकाळी भिशीला जायचे तर कोणती साडी नेसावी? प्रश्नच पडतो बाई मला. शेवटी भिशीला जाण्यासाठी साडी निवडण्यासाठी कपाट उघडले. ही साडी मागच्या भिशीलाच तर नेसली होती, मग नको. ही पिंक रंगाची काढावी का? नको बाई ही तर शेवडे काकूंकडे हळदीकुंकवाला नेसली होती. हां ही रामा कलर कधी नेसली होती बरे...... अरे हां ही मागच्या महिन्यात पाठक काकूंच्या साठीच्या कार्यक्रमाला नेसले होते की. ही ब्लु नेसू का!!! नको बाई रेवतीची आणि माझी सेम साडी आहे. तीपण हीच नेसली तर उगीच बॅंडवाले व्हायचे. अशी एक एक साडी बाद होता होता शेवटी एका साडीचे नशीब उघडले आणि तिची घडी उघडली.

बापरे भिशी करता साडी निवडता निवडता माझ्या नाकात दम आले आणि रमा वर्षभर नवीन साडी किंवा ड्रेस घेणार नाही म्हणते मग काय वर्षभर सगळ्या कार्यक्रमांना त्याच त्याच साड्या नेसणार की काय?

शेवटी कशीबशी साडी काढली आणि तयार होऊन धावत पळत भिशीला पोहोचले सगळ्या साळकाया माळकाया जमल्याच होत्या. इथेही नवीन वर्षाच्या संकल्पावरच चर्चा चालू होती. मी गेल्यावर सगळ्यांनी माझ्याकडेच मोर्चा वळवला. नाही ग काय संकल्प करावा काही सुचतच नाहीये. अग तुम्हाला कळले का रमा

म्हणे वर्षभर नवीन साड्या, ड्रेस काही घेणार नाहीये. नवीन वर्षाचा संकल्प आहे हा तिचा. मी हळूच खालमानेनी सगळीकडे नजर फिरवली,

आज रमा आली नव्हती. मग रमाच्या आगळयावेगळया संकल्पावर चर्चा (गॉसिप) करून रश्मीने केलेल्या बटाटेवड्यांवर ताव मारून संध्याकाळी घरी आले. पण संकल्पाचा विषय काही डोक्यातून जात नव्हता. घरी आल्यावर लेकीला भिशीतल्या आणि रमाच्या संकल्पा बद्दल सांगत होते तर तिने मध्येच विचारले "मग आज रमामावशी भिशीला आली होती का"? "नाही ग" मी म्हणाले. मग तुम्ही तिच्याबद्दल यथेच्छ गॉसिप केले असेल न!! लेकीने विचारले. आणि अचानक माझी ट्यूब पेटली. युरेका युरेका सापडला सापडला!!!! अग काय झाले काय सापडला? लेकीने विचारले. अग नवीन संकल्प सापडला. कोणता ग? लेकीने उत्सुकतेने विचारले. या वर्षी कुठल्याही मैत्रिणीच्या पाठीमागे तिच्याबद्दल गॉसिप करणार नाही. असा आगळावेगळा संकल्प करून मी एकदाची मोकळी झाले. "अग तुला झेपणार आहे का हा संकल्प वर्षभर पाळायला"? लेकीने टोमणा मारलाच. तिच्याकडे दुर्लक्ष करून मी समाधानाने स्वयंपाकघराकडे वळले.

बघता बघता नव्याचे नऊ दिवस संपले. पण तोवर माझ्या पोटात इतके दुखायला लागले होते की बस. अजिबात सहन होईना. शेवटी आणखीन दोन दिवस कसेबसे काढले. आणि बाराव्या दिवशी सरळ माझ्या क्लोज फ्रेंड कडे अनघा कडे गेले. आणि भडाभडा बोलून मोकळी झाले. तेंव्हा कुठे पोट दुखायचे थांबले. आणि माझ्या लक्षात आले की हा संकल्प काही माझ्याकडून वर्षभर निभावला जाणार नाही. म्हणून मग त्यावर उदक सोडून मोकळी झाले.

मग शेवटी पुन्हा नेहेमीचाच संकल्प करायचा ठरवले. (हो हो तोच वजन कमी करण्याचा) पण या वेळेस नेटाने संकल्प पुरा करायचा असा दुसरा संकल्प पण केला. तेंव्हा कुठे जीव भांड्यात पडला.

इति संकल्प पुराणाची पाचा उत्तराची कहाणी साठाउत्तरी सुफळ संपूर्ण.

# हुंकार...

बाळाचा पहिला हुंकार म्हणजे घरातल्या सगळ्यांसाठी अहोभाग्याचा, कौतुकाचा क्षण. केवढा आनंदाचा क्षण असतो तो. पुढे त्याच हुंकाराचे हळूहळू शब्दात रूपांतर होते. त्या हुंकारातून शब्द कधी उमटतोय याची सगळेच आतुरतेने वाट पहात असतात.

पुढे मोठेपणी मात्र शब्द टाळण्यासाठी हेच हुंकार दिले, वापरले जातात. त्या एका हुंकारातून वेगवेगळ्या वेळी परिस्थितीनुरूप वेगवेगळे भाव व्यक्त केले जातात. आणि अनेक अव्यक्त शब्द बोलले जातात. या हुंकारांची खरच एक मोठी गम्मत असते. पुढील संवादात बघा एका हुंकारातून किती भावना व्यक्त केल्या जातात आणि संवाद साधला जातो.

सकाळी ‘ अहो ‘ निवांत पेपर वाचत बसले होते. समोरच्या टी-पॉय वर चहाचा कप ठेऊन “ हूं “ म्हणून मागे वळले (गिळा एकदाचा, रागाचा हुंकार) मी मागे वळले तशी पटकन सुधीर ने माझा हात धरला, “ अजूनही रागावली आहेस?” मान वेळावत हात सोडवण्याचा प्रयत्न करत म्हणाले “ हूं “ तुम्हाला काय फरक पडतो (थोडा सौम्य राग आणि थोडा अहंकार) सोडा मला, जाऊद्या, कामे पडली आहेत सगळी. तसे नवरोजी म्हणाले, “ बैस

ग जरा, कामे तर रोजचीच आहेत.'' ''हूं'' मी ढीम्म उभी. (कर आता माझ्या विनवण्या. हा थोडा बेफिकीर हुंकार) असे काय? बैस ना जरा!! असे म्हणून मला जबरदस्तीने शेजारच्या खुर्चीवर बसवले. आणि हळूच माझ्या हातात दोन सोनचाफ्याची फुले ठेवली. पण आज मी विरघळणार नव्हते. माझा निश्चय पक्का होता. मी पुन्हा कामाचे तुणतुणे वाजवले. '' अग मी करेन की तुला कामात मदत. मला माहिती आहे तुझा कालचा राग गेला नाही अजून. ''हूं'' म्हणून मी मान वळवली. मनात म्हणाले, आला आता आईचा बबड्या, आईची बाजू घ्यायला. (फणकाऱ्याचा हुंकार) माझी समजूत काढत नवरा म्हणाला,

''माहिती आहे ग, तू घरासाठी, आमच्या सगळयांच्या साठी खूप करतेस'' तशी मी उसळलेच. मग! करणारच ना!! हे घर माझे आहे. घरातली माणसे माझी आहेत. आपल्या लग्नाला पंचवीस वर्ष होऊन गेली. सणवार, कुळधर्म, कुळाचार, सगळयांच्या सवयी, आवडीनिवडी सगळ सगळ पाठ आहे मला. आणि मी सगळयांचे सगळे अगदी निगुतीने आणि साग्रसंगीतपणे करते सुद्धा. काय करते ना? बोला ना? '' हो करतेस ग सगळं. सगळं अगदी छान सांभाळतेस. मी कधी अमान्य केले आहे का? पण तुम्ही सासुबाईंना पण कधी दोन शब्द सांगत नाही ना!! त्यांचे आपले फोन करून सारख्या सूचना देणे चालूच असते. याला काय अर्थ आहे? मी सुद्धा

अगदी लोणच्यासारखी मुरले आहे संसारात. मला कळते सगळे. ‘‘हूं‘‘sss (मोठा फणकाऱ्याचा हुंकार)

आताचच बघा ना, आता श्रावणात शुक्रवारी सवाष्ण कुणाला बोलवायचे ते पण त्यांनीच तिथे गावाला बसून ठरवायचे. ते काही नाही हां! यावेळी मी माझ्या मैत्रिणीलाच बोलावणार आहे सवाष्ण म्हणून. सांगून ठेवते हां sssss (मोठा हुंकार, मनातली खदखद, मनातला राग बाहेर पडला) आणि एवढच असेल ना, तर स्वत: यावे इकडे. आणि जबाबदारी घेऊन करावे सगळे स्वत:ला हवे तसे.

“ हूं “ असे आहे तर!! (नवऱ्याचा समजुतीचा हुंकार.) हे बघ तू चिडू नकोस, मी समजावतो आईला. तू तुला तुझ्या हव्या त्या मैत्रिणीला बोलाव सवाष्ण म्हणून. (हूं बोलावीनच. माझा जिंकल्याचा हुंकार) खरच? हूंsss (माझा लडिवाळ हसरा हुंकार) बघ बरं हसल्यावर किती गोड दिसतेस ती!! माझ्या केसांची बट पुढे ओढून “ हे म्हणाले “ बघ हसरा चेहरा आणि त्यावर आलेली ही बट!! किती सुंदर दिसते बघ. पुन्हा एकदा तुझ्या प्रेमात पडावेसे वाटते आहे. “

“ हूं “ काहीतरीच हां तुझे. (माझा लज्जेचा हुंकार)

अगबाई बोलण्याच्या नादात चहा गार झाला की! थांब गरम करून आणते. नको राहू दे ग. तुझा असा हसतमुख चेहरा समोर

असला की गार चहा सुद्धा छानच लागतो. सुधीर अरे काहीतरी काय, दे तो कप. आत्ता गरम करून आणते. माझ्या हातात कप देत सुधीर म्हणाला " मग असे कर ना! मी हूं म्हणत त्याच्याकडे बघितले. (माझा लडिवाळ प्रश्नार्थक हुंकार) " दोघांसाठी मस्त आले घालून ताजाच फक्कड चहा कर ना!! मस्त पावसाळी हवा आहे. थोडावेळ गप्पा मारत बसुयात. "हूं" (मान डोलवत) म्हणत मी गार चहाचा कप घेऊन आत गेले.

(माझा सम्मतीचा आणि समाधानाचा हुंकार)

न बोलताही बरेच काही सांगून जाणारा असा हा हुंकार कधी कधी मात्र मदतीला येतो. जर हो किंवा नाही असे काहीच उत्तर देता येत नाही तेंव्हा नुसते हूं म्हणून काम भागवता येते. पण हाच हुंकार समोरच्याच्या मनात संभ्रम निर्माण करतो. हो की नाही, नक्की उत्तर कळतच नाही.

आहे की नाही हुंकाराची गम्मत?

# प्रकाश...

***तीन प्रहरांचा तो खेळ असे***
***दिवस रात्रीचा असा मेळ बसे***
***दिवसाची चाहूल देते ती पहाट***
***आपण पाहतो सूर्योदयाची वाट***
***सूर्योदय होता उजळे प्रकाशवाट***

अंधार आणि प्रकाश हे खरे तर सापेक्ष शब्द आहेत. खगोल शास्त्रानुसार सूर्य मावळला की अंधार होतो. आणि उगवला की प्रकाश पडतो. संध्याकाळी जर कुणी घरात दिवे न लावता बसला असेल तर आपण म्हणतो काय दिवाभिती सारखा बसला आहेस. आणि सगळे दिवे पटापट लावतो. घर त्या दिव्याच्या प्रकाशात न्हाऊन निघते.

प्रकाश हा शब्द फक्त उजेड या अर्थाने न वापरता अनेक वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या वेळी तो वापरला जातो. उष:काल होताहोता काळरात्र झाली. आणि पुन्हा एकदा महाराष्ट्र मोगलाईच्या अत्याचारांच्या टाचांखाली भरडला जाऊ लागला. समाज पारतंत्र्याच्या खाईत लोटला गेला. आणि अचानक आशेचा एक किरण शिवनेरीवर लुकलुकला. महाराष्ट्राच्या भाग्याचा,

शिवरायांचा जन्म झाला. महाराजांच्या अविरत आणि अथक प्रयत्नांनी महाराष्ट्र स्वराज्याच्या प्रकाशात उजळून निघाला. दुर्बल, गलीतगात्र झालेल्या समाजाला समर्थ रामदास स्वामींनी बलोपासनेचा मार्ग दाखवला. आणि शक्तीच्या प्रकाशवाटेवर तानाजी, येसजी, बाजी यांचे जीवन उजळून निघाले.

ज्ञानेश्वरांनी भगवद्गीता प्राकृतात आणली आणि अंधश्रद्धा आणि कर्मकांडांच्या मार्गावरून विनाशाकडे जाणाऱ्या समाजाला ज्ञानेश्वरीच्या रूपाने ज्ञानाचा नवा प्रकाशमार्ग दाखवला. परमेश्वरापर्यन्त पोहोचणारी प्रकाशवाट नाम:स्मरणासारख्या साध्या सोप्या वाटेने जाते. तुकाराम महाराज, जनाबाई, चोखामेळा, गोराकुंभार, बहिणाबाई यांनी ही भक्तीची प्रकाशवाट समाजाला दाखवली.

साधनाताई आणि बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्याना आनंदवनातून निघणाऱ्या आनंदाच्या आणि स्वावलंबनाच्या प्रकाशवाटेवर नेऊन सोडले. रस्त्यावरील मनोरुग्ण स्त्रियांकरता काम करणारे धमाणे दाम्पत्य, भिकाऱ्यांकरता काम करणारे सोनावणे दाम्पत्य, नर्मदा प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी खंबीरपणे उभ्या असलेल्या सुश्री भारतीताई ठाकुर ही आणि अशी अनेक माणसे आज

समाजातील वेगवेगळ्या स्तरावरील वेगवेगळ्या लोकांना प्रगतीच्या प्रकाशवाटेवर घेऊन जात आहेत.

काळोखातून उजेडाकडे जाणारी प्रत्येक वाट आणि त्या वाटेवरील प्रत्येक पाऊल यशाच्या शिखरावर घेऊन जाते. खरेतर प्रकाशाचे एक स्फुल्लिंग प्रत्येकाच्या अंतर्मनात असतेच. फक्त ते फुंकर मारून प्रज्वलित करायचे असते. त्यातून उडालेल्या ठिणगीमुळे यश, किर्ती, समृद्धीच्या शिखरावर माणूस जाऊन पोहोचतो.

त्यांच्या बरोबरच त्यांच्या आयुष्यात येणाऱ्या अनेक लोकांची आयुष्य त्या प्रकाशात उजळून निघतात. उदाहरण म्हणून जमशेदजी टाटा, नारायण मूर्ती, भीष्मराज बाम यांच्याकडे बघता येईल.

स्वता:च्या प्रकाशवाटेवर यशाचा मार्ग तर सगळेच चालतात. पण इतरांना सुद्धा मदतीचा हात देऊन त्यांना जे स्वत:च्या प्रकाशवाटेवर आणून त्यांचे आयुष्य पण उजळवून टाकतात त्यांची प्रकाशवाट खऱ्या अर्थाने तेजस्वी होते. आणि मग .............

***फिटे अंधाराचे जाळे | झाले मोकळे आकाश ||***
***दरी खोऱ्यतून वाहे | एक प्रकाश प्रकाश ||***
***सूर्य जन्मता डोंगरी | संगे जागल्या सावल्या ||***
***एक अनोखे लावण्या | आले भरास भरास ||***

# मनरंग...

***मन राम रंगी रंगले | मन आत्मरंगी रंगले ||***

मनाचे काय सांगावे फिरत असते कुठेकुठे. आत्ता इथे तर मग तिथे.

एक दिवस सहजच लेकीच्या लग्नाचा अल्बम बघितला. मायेचा रंग डोळ्यातून वाहू लागला.

कुलू मनाली ट्रिपचा अल्बम काढला. शुभ्र हिमशिखरांचा रंग मन माझे ल्याले.

केरळ ट्रिपचा अल्बम काढला तर निसर्गाच्या हिरव्या झुल्यावर आधीच झुलू लागले.

तेवढ्यात इकडच्या स्वारींची हाक कानी आली. जरा चहाच्या रंगात रंगवा की त्या मनाला.

मी उठले चहा करायला पण मन मात्र गेले आसाम फिरायला.

मनरंग या शब्दातच मला वाटते रंगांची जादू आहे. विचार करायला गेले तर कितीतरी छटा दिसतात. आणि कोणाच्या मनाचा रंग कोणता असेल असा प्रश्नही पडतो. आजच्या वीस वर्षांच्या

तरुणाईच्या मनाचा रंग काय असेल? शिक्षण, करियर, बाइक, पार्टीज, प्रेयसी, प्रियकर अशा अनेक रंगछटा त्याच्या मनात असतील. पण तेच सोळाव्या वर्षी स्वराज्य स्थापनेची शपथ घेणाऱ्या शिवाजी महाराजांच्या मनाचा रंग कोणता असेल? शौर्याचा, हिंदुत्वाचा भगवा रंग की आणखी कोणता? जय भवानी, जय शिवाजी म्हणत शत्रूवर तुटून पडणाऱ्या बाजी, तानाजी, मुरारबाजी अशा जिवावर उदार होऊन शत्रूवर तुटून पडणाऱ्या तरुण मावळयांच्या मनाचा रंग कोणता असेल? स्वामीभक्तीचा की स्वराज्य प्रेरणेचा?

रात्रीतून बाळासाठी कातळकडा उतरून जाणाऱ्या त्या माऊलीच्या मनाचा मायेचा, वात्सल्याचा रंग आजही आपल्या अंगावर रोमांच उभा करतो. पाठीवर मूल बांधून

“ मेरी झाशी नही दुंगी “ म्हणत तटावरून भरवेगात घोडा फेकणाऱ्या झाशीच्या राणीच्या मनाचा रंग कोणता होता? शौर्याचा, पराक्रमाचा की स्वाभिमानाचा?

स्वातंत्र्याच्या अग्निकुंडात स्वत: सह कुटुंबाची आहुती देणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या देशप्रेमाचा रंग कसा होता?

कारगिल असो की गलवान की उरीचा सर्जिकल स्ट्राईक, ऊन वारा पाऊस कशाचीही तमा न बाळगता जागेवर पाय रोवून उभ्या

असणाऱ्या सैनिकाच्या मनाचा रंग त्याच्या वर्दीचा रंग असतो का? लढाईत वीर मरण आलेल्या शहिदांच्या पत्नीच्या कुंकवाचा लाल रंगच त्यांच्या दुःखाने विद्ध झालेल्या मनाचा रंग असतो का? बारा चीनी सैनिकांना कंठस्नान घालता घालता वीर मरण आलेल्या तेवीस वर्षीय गुरु तेजसिंग आणि त्याच्या होणाऱ्या पत्नीचा रंग आम्हाला समजू शकेल का?

आणि या सगळ्याचे सोशल मीडियावर राजकारण करणाऱ्या, पुरावे मागणाऱ्या राजकारण्यांच्या मनाचा गलिच्छ रंग पुसून टाकण्यासाठी लागणारा निर्भय रंग आज आपल्या मनात आहे का?

हे आणि असे अनेक ' का ' कायमच मनाला छळतात आणि एक उदास, करुण, गढूळ रंगछटा मनावर ठेऊन जातात.

# गुढी --------------

ब्रम्हदेवांनी सृष्टीची निर्मिती केली तो आपल्या वर्षाचा पहिला दिवस म्हणजे गुढी पाडवा होय. चैत्र महिन्याचा पहिला दिवस म्हणजे गुढी पाडवा. रावणावर विजय मिळवून प्रभू रामचंद्र अयोध्येत पोहोचले तो दिवस म्हणजे गुढी पाडवा. शालिवाहन राजाने आपले शक संवत्सर सुरु केले तो दिवस म्हणजे गुढी पाडवा. बळीराजा आपल्या प्रिय नगरजनाना पाताळातून भेटायला येतो त्यावेळी आनंदाने त्याच्या स्वागतासाठी नगरजन गुढ्या उभारतात अशी कथा आहे. अशी ही गुढीची परंपरा आपल्याकडे फार जुनी आहे. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी गुढीपाडवा हा सण साजरा करण्यास सुरवात केली. गुढी उभारण्याची प्रथा ही शिवरायांची संकल्पना होती. विजयादशमीला बाहेर पडलेली सेना विजय मिळवून परत येत असे. म्हणून त्याकाळी विजयोत्सव साजरा करण्यासाठी घरोघरी गुढी उभारली जाऊ लागली. पुढे याच गुढीपाडव्याला सणाचे महत्व आले.

चैत्र महिना म्हणजे वसंत ऋतूचे आगमन. वसंत ऋतू म्हणजे ऋतूंचा राजा. अवघी सृष्टी या राजाच्या स्वागताला सज्ज होते.

शिशिरातील पानगळ संपून वृक्ष वेली हिरवा साज परिधान करतात. थंडी संपून वातावरण उबदार होते. कोकीळकूजन मन प्रसन्न करते. या दिवसात चराचरात चैतन्याचे, उत्साहाचे वातावरण असते. शेतीची कामे संपून धान्य बाजारात येते. त्यामुळे शेतकरीराजा सुखावतो. याच उत्साहाने आणि आनंदाने गुढी उभारून आपण नव वर्षाचे स्वागत करतो.

या दिवशी ब्रम्हदेवांनी सृष्टीची निर्मिती केली म्हणजेच नवनिर्मितीचा हा उत्सव . प्रभू रामचंद्रांनी रावणावर विजय मिळवला म्हणजेच हा विजयोत्सव . बळीराजाला पाहून नगरजनाना आनंद होतो म्हणजेच हा आनंदोत्सव. शालिवाहन शक प्रणित नववर्षाचा हा वर्षोत्सव. शिवरायांनी याच विजयोत्सवाला परंपरेचे रूप दिले.

परंपरेने हा उत्सव आजही महाराष्ट्रात सगळीकडे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. घरोघरी गुढी उभारली जाते. भक्तिभावाने तिची पूजा केली जाते. दुपारी श्रीखंड पुरीचे चारीठाव जेवण होते आणि दुपारभर मस्त ताणून दिली जाते. सध्या इंटरनेटचे राज्य असल्याने व्हाट्सअप वर शुभेच्छांचे संदेश फिरत राहतात. असं म्हणतात की आजच्या दिवशी नवीन गोष्ट विकत घेतली तर

घरात समृद्धी येते, भरभराट होते. म्हणून आज सोन्या चांदीच्या दुकानात तुडुंब गर्दी असते.

काळानुरूप काही बदल झालेत. हा सण घरात साजरा होतो तसाच आता बाहेर पण साजरा केला जातो. नववर्षाच्या स्वागतासाठी ढोल ताशाच्या गजरात पहाटे मोठी शोभायात्रा काढली जाते. मिरवणुकीच्या स्वागताला रस्त्यावर सडा रांगोळी केली जाते. सगळीकडे वातावरण अगदी प्रसन्न असते. अनेक ठिकाणी पहाट पाडव्याचे कार्यक्रम आयोजित केले जातात. ठिकठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

परंपरेने सण साजरा केलाच पाहिजे. पण त्याच बरोबर ज्या कारणाने ही परंपरा सुरु झाली त्याचा सुद्धा विचार व्हायला पाहिजे. बळीराजा, शालिवाहन राजा, रामायण किंवा अगदी शिवरायांचा काळ तसा खूप जुना झाला. पण आजच्या काळात प्रवाहा विरुद्ध जाऊन, वेगळ्या गोष्टी करून आपल्या पराक्रमाची, कर्तृत्वाची गुढी उभारणारे अनेक जण आपल्याला दिसतील.

ज्या काळात स्त्रियांनी शिकणे हे पाप मानले जायचे त्या काळात समाज प्रवाहा विरुद्ध जाऊन रमाबाई रानडे , सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची गुढी उभारली. तर आनंदीबाई जोशी यांनी इंग्लंड मध्ये अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून आपल्या विद्वत्तेची आणि ध्येयपूर्तीची गुढी परदेशात ही उभारली. ज्या काळात कुलीन, घरंदाज स्त्रीयांना संगीत क्षेत्राचे दरवाजे बंद होते त्याकाळात गंगाबाई पलुस्कर या स्वतः गाणं शिकल्या आणि कुलीन घरंदाज स्त्रीयांसाठी स्वतंत्र संगीत क्लासेस सुरु करून त्यांच्यासाठी सांगितिक गुढी त्यांनी उभारली. आणि घराघरात हिंदुस्थानी संगीताला मानाचे स्थान मिळवून दिले. आपल्या पाल्यांनी गाणं, नृत्य शिकावे हा आज पालकांचाच हट्ट असतो. पण त्याकाळात घराघरात संगीत पोहोचवणे सोपे नव्हते. बाबा आमटे यांनी सुखासीन आयुष्य सोडून कुष्ठरोग्यांच्या सेवेचे खडतर व्रत स्वीकारले. कुष्ठरोग्यांना माणसात आणले आणि माणुसकीची गुढी उभारली. त्यांच्या पुढच्या पिढ्या ही गुढी आणखी आणखी उंच नेत आहेत. नर्मदा परिक्रमा करून त्यावर पुस्तके लिहिणारे अनेकजण आहेत. पण नर्मदा प्रकल्पातील विस्थापितांचे दुःख, वेदना समजून घरदार नोकरी सोडून त्यांच्यात जाऊन रहाणाऱ्या भारती ठाकूर यांनी विस्थापितांच्या घरात साक्षरतेची आणि स्वावलंबनाची गुढी उभारली आहे. अशी अनेक

उदाहरणे आपल्या आजूबाजूला आपल्याला अनेकदा दिसतात. कितीतरी माणसे अशी पण असतात की जी आपले दैनंदिन जीवन सांभाळूनही इतरांच्या जीवनात आनंदाची गुढी उभारण्याचा प्रयत्न करत असतात. या अशा अनेक लोकांमुळे गुढीपाडवा या सणाला किंवा गुढी उभारणे या परंपरेला खरा अर्थ लाभतो.

जानेवारीत सुरु होणाऱ्या नववर्षाला आपण स्वतःच्या सुख समृद्धी साठी, आरोग्यासाठी काही ना काही संकल्प करतो. यावेळी या नववर्षाला स्वतःच्या घरात जैताची, स्वानंदाची, समृद्धीची, सायुज्जतेची गुढी आपण उभारूयात आणि त्याच बरोबर या वर्षभरात आनंदाची, साक्षरतेची, माणुसकीची, अशी कुठली ना कुठली गुढी दुसऱ्या कुणाच्यातरी दारात उभी करण्याचा संकल्प आपण सगळ्यांनी करून या सणाच्या परंपरेला एक नवा आयाम देऊयात .

बघा पटतंय का!

# बजेट -- एवढं काय त्यात!!

आईची शप्पथ घेऊन सांगतो मला बजेट मधलं काहीही कळत नाही. पण आसपासचे लोकं "बजेट आहे, बजेट आहे" म्हणून अशी काही वातावरण निर्मिती करतात की मी उगाचच एक्ससाईट होऊन त्याची वाट बघायला लागतो. सगळे बसतात म्हणून मग मी पण अर्थशास्त्र कोळून प्यायल्याचा आव आणून गंभीर चेहेरा करून टीव्ही समोर बसतो. अर्थमंत्र्यांच दोन तीन तासांचं भाषण जांभया देत देत ऐकल्यावर "आपल्याला ह्यातलं काय कळलं? असा प्रश्न एकांतात मी स्वत:ला नेहमीच विचारतो. आता हा प्रश्न क्षणिक असला तरी आपल्याला नेमका काय फरक पडला? हा प्रश्न तर वर्षभर सतावत असतो. बजेटमध्ये अमुक अमुक गोष्टी स्वस्त झाल्या असं जाहीर करतात. त्या खरंच झाल्यात का हे बघायला मी मुद्दामहून कधीही बाजारात जात नाही. आधी आईने आणि आता बायकोने दिलेली सामानाची यादी बाजारात जाऊन निमूटपणे सामान घेऊन येणे आणि आणल्यावर ते कसे महाग मिळाले, क्वालिटी कशी खराब आहे असे टोमणे खाली मान घालून ऐकणे एवढंच आम्हाला माहिती. त्यात आजकाल तर आम्ही मॉल किंवा सुपरमार्केटमध्ये जातो. त्यामुळे सामानाचं बिल

जरा जास्त वाटलं तर घेतलेल्या पन्नास टक्के तद्दन निरुपयोगी वस्तूंपैकी दोन-चार काढून ठेवायच्या. खरे तर वस्तु बाजूला काढायची पण गरज नसते. कारण कार्डचतर स्वाईप करायचे असते. कुठे खिशाला डायरेक्ट झळ बसणार असते? पण काटकसरीपणाचा आव आणावा लागतो.

इतके सरळसाधे आमचे हिशोब असतात. तरीसुद्धा आम्ही बजेट बजेट करून का नाचत असतो हे माझं मलाच कळत नाहीये!

त्यातल्या त्यात इन्कम टॅक्सच्या मर्यादेत आल्यापासून बजेटच्या त्या भागातलं मला थोडंफार कळतं. सरकारची मेहेरबानी झाली तर वर्षाकाठी दोन-चार हजार रुपये वाचतात. वाचलेले हेच दोन-चार हजार रुपये सरकार इतर गोष्टींचे भाव वाढवून आमच्याकडून दुपटीने नकळतपणे वसूल करून घेते. मला आजवर उमगलेलं बजेट एवढंच आहे. पण मी काय म्हणतो, समजा सरकारने टॅक्स कमी केला आणि भाव वाढवले नाही. तरी त्या दोन-चार हजारात आम्ही नेमके कोणते बंगले बांधणार आहोत? पण इन्कम टॅक्स हा लोकांच्या इतक्या जिव्हाळ्याचा विषय आहे की, च्यायला सरकारने टॅक्स वाढवला नसता तर फेरारीचं बुक करणार होतो ह्या आवेशात लोक तावातावाने बोलत असतात. बजेट

जाहीर झाले की पुढचे आठ दिवस फक्त बजेट हाच विषय चर्चेचा असतो. स्थानिक पातळीवर ठिकठिकाणी तज्ञांची जाहीर भाषणे ठेवली जातात.

बजेट म्हणजे सरकारचे जमा खर्चाचे वार्षिक अंदाजपत्रक अशी सरळसाधी व्याख्या आहे. आता अंदाज म्हटलं की तो चुकणारच अशी समजूत करून लोक गप्प का बसत नाहीत? नाहीतरी लोकसंख्येपासून ते हवामानापर्यंत कोणता सरकारी अंदाज बरोबर आलाय आजपर्यंत? बरं सरकार इतके लाखो कोटींचे बजेट सादर करते. पुढल्या वर्षी त्यातले किती खर्च झाले हा प्रश्न कोणालाच कसा पडत नाही? (तुम्हाला सांगतो, लोकसभेच्या अध्यक्षपदी जर आमच्या गल्लीतला वाणी बसला असता तर त्याने अर्थमंत्र्यांना, "ओ आधी जुना हिशोब क्लियर करा..... मग पुढचं बघू." असं ठणकावून सांगितलं असतं.) तसं पाहिलं तर हा प्रश्न आम्हाला महिन्याच्या घराच्या बजेटमध्ये सुद्धा पडत नाही. कारण मुळात तो प्रश्न पडण्याची गरजच पडत नाही. महिनाअखेर अकाउंटमधली शिल्लक रक्कम बघून आपलं बजेट पार बोंबलले आहे हे दिसूनच येते. सरकारला फिस्कल डेफिसिट इकडून तिकडून कमी करण्याची सोय तरी असते. आम्हाला ती पण

नाही. आमचे फिस्कटलेले बजेट म्हणजेच आमचे फिस्कल डेफिसिट!!

काल रात्री असंच मी बजेट- बजेट म्हणून नाचत असताना बायकोने " एवढे काय त्यात? असे विचारून मला गप्प केले. तिला एवढे काय हे समजावून सांगताना मला बजेटचा "ब" सुद्धा समजत नाही असे माझा अंतरात्मा ओरडून ओरडून सांगत होता. तरीसुद्धा मी जागतिक कीर्तीचा अर्थतज्ञ होऊ शकतो असा गैरसमज थोडावेळा करता निर्माण करण्यात मी यशस्वी झालो होतो. पण तेवढ्यात धोब्याकडून पैसे परत घेताना मी दहा रुपयाची फाटकी नोट घेऊन आलोय हे तिच्या लक्षात आले. आणि माझ्यातल्या तज्ञाचा त्रिफळा उडाला.

आमचे एक जाऊद्या. (कारण आमचे नेहमीच जाऊ देण्या लायकीचे असते म्हणा!) पण मंत्रालयातले सगळे तज्ञ मिळून बजेट कसे तयार करत असतील हा प्रश्न मला नेहमी पडतो. म्हणजे बघा, अर्थमंत्री असे राजासारखे दरबारात उच्चासनावर बसले असतील. वेगवेगळ्या विभागाचे अधिकारी डोळ्यात अत्यंत करुण भाव आणून हात जोडून राजाकडे पैसे मागत असतील. राजा आणि

प्रधान आपल्याच तोऱ्यात एकेकाची हजेरी घेत असतील." का रे रेलव्या, तुला कशाला पाहिजे पाच लाख कोटी? कशाला नवीन रेल्वे लाईन टाकायच्या आहेत? आहेत त्या सांभाळ आधी.. चल हे घे दोन लाख कोटी.... आणि तू रे परिवहन... चारशे कोटीच्या वरती एक रुपया मिळणार नाही सांगून ठेवतो. आणि त्या समाजकल्याणला द्या शंभर कोटी. तो रस्ते विकास बघा कसा लपून बसलाय कोपऱ्यात. कायरे मागच्या वर्षी सत्तर हजार कोटी दिले तुला ते काय जावयाच्या गावात हायवे बांधण्यासाठी होय रे? एक रुपया देणार नाही तुला आता. तुला किती पाहिजे रे संरक्षण? तुमचं काय बा तुम्ही मोठी माणसं. तुम्हाला ब्लँक चेकच द्यावा लागतो. प्रधानजी ह्यांना मोकळे करा लौकर. अहो कृषिताई तुम्ही कशाला रडताय? तुमची वेगळी व्यवस्था आहे. हे बघा.... तीन लाख कोटी ठेवलेत दुष्काळासाठी.. ओला की कोरडा ते तुमचं तुम्ही बघा... आणि तो बालविकास राहिला की हो.... अहो मुले म्हणजे आपल्या देशाचं भविष्य. द्या त्याला हजारेक कोटी. दोन-चार तरी बगीचे बांधा हो ह्याच्यात.. आणि हो शिक्षणाचे काय तुमच्या? पाच हजार कोटी देतो अन सहा नवीन विद्यापीठे घोषित करुन टाकतो.... चालेल का? अरेरे जलसंवर्धन करायचे राहिले ना.... आणि आदिवासी वगैरे.... प्रधानजी उरलेले वाटून टाका बरं ह्यांच्यात. चला झाले का सगळे... करा हिशोब प्रधानजी अन मारा

प्रिंटआउट.. अन जरा दोन-चार चारोळ्या वगैरे टाका अधूनमधून..... लोकांना हसवायला बरं पडतं ते "

असो. बजेट जाहीर झालंय. आज बजेट सादर होण्यापूर्वीच हे मनोगत जगासमोर मांडावे असे वाटत होते. पण नंतर विचार केला, आपली परिस्थिती ही बजेट सादर होण्याआधीही आणि नंतरही तीच असणार आहे. मग नंतरच करू ना... एवढं काय त्यात!!

आज रात्रीचा विषय - सरकारने बजेटमध्ये काय काय करायला हवे होते....

रुपया कसा येणार आणि कसा जाणार.

कसा का जाईना. आपल्याला काय फरक पडतो.

बजेट म्हणल्यावर एक ढलपी इकडे एक ढलपी तिकडे.

एवढं काय त्यात!!

# प्रवाह...

प्रवाह म्हणजे ओघ किंवा गती. पाणी किंवा वारा हे गतीशिल असतात.

पाणी ही माणसाच्या आयुष्यातील सगळयात महत्वाची गोष्ट असते. पाणी म्हणजे माणसाच्या जीवनमरणाचा प्रश्न. हे ओळखूनच राजा भगीरथानी भगीरथ प्रयत्नांनी गंगेला प्रसन्न करून घेतलं आणि गंगा पृथ्वीतलावर अवतरली. आणि प्रवाहित झाली त्यामुळे माणसाचे आयुष्य सुद्धा समृद्ध आणि प्रवाही झाले.

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे तो समाजाच्या प्रवाहाच्या दिशेने जात असतो. म्हणजेच प्रवाहपतित होत जातो अनेकदा या प्रवाहात त्याला वाहत जावे लागते. अनेकदा काही गोष्टी मान्य नसतात पटत नसतात पण तरीही तो प्रवाहाबरोबर पुढे पुढे जात असतो. आहे ती परिस्थिती मनाविरुद्ध स्वीकारून पुढे जात राहतो.

वाऱ्याला आणि पाण्याला जशी गती असते तशीच गती माणसाच्या जीवनाला पण असते. पाणी, वारा आपल्या प्रवाहाच्या ओघा बरोबर मागची घाण कचरा वाहून नेतात पण माणूस मात्र

अनेकदा वाईट किंवा चुकीच्या रूढी-परंपरांच्या प्रवाहात इच्छेने किंवा अनिच्छेने वाहत जातो. जर पाण्याचा प्रवाह थांबला पाणी एका जागी तुंबले तर त्यावर शेवाळे धरते तसेच अनेकदा प्रवाहपतित समाजाची प्रगती खुंटते आणि समाजाला एक वैचारिक कीड लागते. आणि मग अनेक अनिष्ट प्रथांचा पायंडा पडतो

नदीत पाण्याच्या प्रवाहा विरूद्ध पोहणे खूप अवघड असते पार दमछाक होते पण काही लोक जिद्दीने पोहतात आणि किनारा गाठतात. वारा आपल्या बरोबर पाला पाचोळा वाहून नेतो आणि मग नंतर येणाऱ्या पावसात धरतीच्या उदरात नवीन बीज अंकुरते सृष्टी अंगोपांगी बहरते तसेच समाजाला लागलेल्या अनिष्ट रूढी परंपरांची कीड उखडून फेकली की समाज पुन्हा नव्याने प्रवाहीत होतो आणि प्रगतीच्या वाटेवर चालू लागतो. तसेच काही माणसे समाज प्रवाहाविरुद्ध दंड थोपटून उभे राहतात आणि समाज प्रवाहाविरुद्ध पोहायला तयार होतात. आणि मग आताच्या काळात लागू न होणाऱ्या समाजातील अनेक रूढी-परंपरांना, चालीरीतींना छेद दिला जातो. जसे सती जाणे , बालविवाह , स्त्री शिक्षण अशा अनेक जुन्या बुरसटलेल्या रूढीं विरुद्ध राजा राम मोहन राय , धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, असे अनेक समाजसुधारक

समाजाविरुद्ध दंड थोपटून उभे राहिले आणि या अनिष्ट प्रथांचा त्यांनी नि:पात केला. म्हणूनच आज स्त्री कुठल्याही क्षेत्रात मागे नाही.

कधीकधी पोहता येत नसेल तर किंवा पाण्यातील भोवऱ्यात माणूस अडकला तर गटांगळ्या खातो त्याचप्रमाणे प्रवाहपतित होऊन सुद्धा अनेकदा गटांगळ्या खायची वेळ माणसावर येते पण त्यावेळी ठामपणे नकार देण्याची हिम्मत असेल तर त्या भोवऱ्यातूनही सहीसलामत बाहेर पडू शकतो.

काही वेळा नकळत एखाद्या प्रवाहात माणूस ओढला जातो पण नंतर तो रस्ता योग्य वाटला नाही, पटला नाही तर मागे फिरण्याची संधी आपल्याला असते पण त्यासाठी वेळीच सावध होणे आवश्यक असते. अनेकदा असे होते की त्या प्रवाहाबरोबर माणूस इतका पुढे निघून जातो की त्याचे परतीचे मार्ग बंद होऊन जातात. मग प्रवाह ज्या दिशेला नेईल तिकडे जात राहणे इतकेच त्याच्या हातात उरते .

काळाचा प्रवाह हा आणखीन एक वेगळाच प्रवाह असतो. जे चांगले ते सांभाळून ठेवण्याची क्षमता या प्रवाहात असते. उत्तम

पुस्तके, नाटके, गाणी काळाच्या ओघात कधीच जुनी होत नाहीत किंवा नष्ट होत नाहीत. पहाट पाडवा दिवाळी पहाट असा एक सुंदर सांस्कृतिक प्रवाह या कालप्रवाहाला येऊन मिळाला आहे त्यामुळे अनेक उदयोन्मुख कलाकारांच्या आयुष्यात सुंदर पहाट झाली आहे.

काळाचा प्रवाह हा खरोखरच कालातीत असतो. राम, कृष्ण, गौतमबुद्ध यांच्या सारख्या थोर विभूती काळाच्या ओघात संपल्या नाहीत तर उलट देवत्वाला जाऊन पोहोचल्या. शिवाजी महाराज राणा प्रताप सिंह यांनाही आज अनेकांच्या मनात देवाचे स्थान आहे.

एक कालप्रवाह मात्र माणसाच्या आयुष्याशी जोडला गेला आहे. आयुष्य थांबवण्याची क्षमता मात्र या कालप्रवाहात नाही. या कालप्रवाहात उलटा प्रवास ही नाही. माणूस जन्मल्या जन्मल्या त्याचा कालप्रवाह सुरू होतो. तास , दिवस , महिने , वर्ष हा प्रवाह पुढेच जात राहतो. या प्रवाहात कुणालाही प्रवाहाविरुद्ध पोहोता येत नाही. हा काल प्रवाह माणसाला मृत्यूच्या शाश्वत सुंदर दारात सोडूनच थांबतो.

# कोपरा...

कोपरा म्हणाल तर मनातली किंवा घरातली एक छोटीशी जागा. पण आपले आयुष्य मात्र, हे कोपरे व्यापून उरतात. कधी आपण घराला कुलूप लावून बरेच दिवसांकरता बाहेर गावी जातो. खूप दिवसांनी घरी परतल्यावर घराची साफसफाई हा ऐरणीवरचा विषय असतो. घर झाडूनपूसून स्वच्छ केले जाते. पण म्हणताना मात्र आपण घराचा कोपरा न कोपरा स्वच्छ केला असे म्हणतो. कुठे बाहेर जायचे असेल तर चपला पायात सरकवता सरकवता सहज म्हणतो जरा कोपऱ्या पर्यन्त जाऊन येते. किंवा सहज मुलांना सांगतो जा रे जरा कोपऱ्यावरून दूध आण बरे पटकन. असा हा कोपरा आपल्या भौतिक जीवनात वारंवार येतो. घरातील काही वस्तू तर आपापले कोपरे धरून बसतात. जसे घरातील केरसुणी, धुणे वाळत घालायची काठी यांचे कोपरे प्रत्येक घरात ठरलेले असतात.

आमच्याकडे आवारात एका कोपऱ्यात मोठे पारिजातकाचे झाड होते. मी झाडाखालची जागा नेहमी गवत वगैरे काढून स्वच्छ ठेवत असे. सकाळी सकाळी झाडाखाली चटई अंथरून मी तिथे अभ्यासाला बसायची. आणि वरून मधून मधून प्राजक्ताची फुले

अंगावर पडायची खूप प्रसन्न वाटायचे आणि अभ्यास पण छान व्हायचा. खरतर आजही लिहायला बसले की ते झाड आणि तो कोपरा मी खूप मिस करते.

मनातल्या कोपऱ्यांचे तर बोलायलाच नको. मला तर वाटते मनात फक्त असंख्य कोपरेच असतात. त्या कोपऱ्यांना भावनांचे कंगोरे असतात. अगदी लहानपणा पासूनच्या कितीतरी गोष्टींनी हे मनाचे कोपरे व्यापलेले असतात.

नको ताई रुसू कोपऱ्यात बसू येउदे ग गालात खुद्कन हसू

किंवा

रुसू बाई रुसू कोपऱ्यात बसू तिकडून आली सासू

अन खुद्कन हसू

असे म्हणत बहिणीला प्रेमाने चिडवणारा छोटा भाऊ कायम बहिणीच्या मनातल्या एका कोपऱ्यात असतोच. लहानपणी मित्र मैत्रिणीं बरोबर खेळलेले खेळ, केलेली दंगामस्ती एका कोपऱ्यात कायमच गर्दी करतात. काही कोपऱ्यात अत्यंत हळव्या आठवणी असतात. जसे कधी अल्पवयातील अव्यक्तपणेच संपलेले प्रेम असते. तर कधी जिव्हारी बसलेला अपमानाचा घाव असतो. काही हळवे कोपरे तर मनाच्या आत दडवून ठेवलेले असतात. पुन्हा कधीही न आठवण्या करता.

मी कॉलेज मध्ये असताना आमच्या यूथ हॉस्टेल च्या ग्रुप मध्ये. कुणाच्या ही नकळत एक अव्यक्त प्रेम एका मनाच्या एका कोपऱ्यात फुलत होते. दोघांच्याही नकळत मैत्रीच्या पलिकडला एक वेगळा धागा विणला जाऊ लागला होता. आणि अचानक एक दिवस.......एकच क्षण.......... सगळेच विस्कटले. होत्याचे नव्हते झाले. ट्रेकिंगला गेलो असतांना काही कळायच्या आत पाय घसरून तो शंभर फुट खोल दरीत कोसळला. आणि तो हळवा कोपरा थरथरत्या हातांनी बंद झाला तो कायमचाच. दर वर्षी त्या तारखेला तो कोपरा कुणाच्या ही नकळत फक्त थरथरतो. असे हळवे कोपरे कधी न उघडलेलेच बरे.

वेगवेगळया कोपऱ्यांमध्ये वेगवेगळया भावना जपलेल्या असतात. अनेक जिंकलेल्या स्पर्धा, मिळालेले यश हे अभिमानाच्या कोपऱ्यात जाऊन बसतात. तर अनेक सुखाचे क्षण आनंदाच्या कोपऱ्यात मजेत हुंदडत असतात. काही दुःखी, अपयशी क्षण अपमानाच्या कोपऱ्यात दडून बसतात. एखाद्या कातरवेळी मात्र अपमानाच्या कोपऱ्यातले दुखरे क्षण बाहेर डोकावतात आणि मन अधिकच उदास होते. खरे तर केंव्हा कोणत्या कोपऱ्यातील क्षण बाहेर डोकावतील काही सांगता येत नाही. मला वाटते खरे तर ते आपल्याच मुडवर अवलंबून असते.

म्हणजे आपण आनंदी असलो तर सुखाचा कोपरा उघडतो आणि त्यातील आठवणी उचंबळून येतात.

खरे तर मन हा असा कोणताच अवयव शरीरात नसतो. त्यामुळे मन आणि त्यातील कोपरे हे आपल्या भावनांचे खेळ असतात. आणि हे खेळच आपले आयुष्य सुंदर आणि रंगीत बनवत असतात.

# तल्लीन होणे...

जेष्ठ संपून आषाढ सुरू झाला की वेध लागतात ते आषाढी एकादशीचे. आणि वारकऱ्यांना वारीचे वेध लागतात. त्यांची नजर विठ्ठल दर्शनासाठी आसुसलेली असते. खरेतर प्रत्येक मराठी माणसाची इच्छा असते की एकदातरी वारी चालावी. जसे एकतरी ओवी अनुभवावी तसेच एकतरी वारी अनुभवावी असे प्रत्येकाला वाटत असते. कुणाला भक्ती म्हणून तर कुणाला उत्सुकता म्हणून.

घाटातून एखाद्या पाण्याच्या प्रवाहाप्रमाणे संथपणे विठूरायाच्या गजरात वारी पुढे जात असते. गजरात रममाण होऊन वय विसरून नाचत-गात जाणारे वारकरी बघितले आणि तल्लीन होणे म्हणजे नक्की काय असते ते समजले.

तल्लीन होणे म्हणजे रममाण होणे. तहानभूक हरपून एखाद्या कामात स्वतःला झोकून देणे.

आपल्यावर एखादे संकट आले किंवा एखादी गोष्ट आपल्या मनासारखी व्हावी असे जेव्हा वाटते तेव्हा आपण देवाचा धावा करतो. खरंतर आपण त्याच्याशी व्यवहाराची भाषा सुरू करतो

माझ्यावरचे संकट टळू दे किंवा माझे अमुक एक काम मनासारखे होउदे मग मी इतके उपास करेन किंवा सव्वा किलो पेढ्यांचा नैवेद्य देईन किंवा पूजा घालेन इत्यादी इत्यादी..... पण तरीही संकटात आपले नुकसान झाले किंवा काम आपल्याला हवे तसे झाले नाही तर लगेच आपण देवाच्या अस्तित्वावरच शंका घेतो.

संत तुकाराम, चोखा मेळा, गोरा कुंभार जसे, त्यांच्या प्रापंचिक जबाबदाऱ्या विठुराया वर सोपवून त्याच्या भजनात तल्लीन होऊन त्याच्याशी एकरुप होऊन जात असत आणि म्हणूनच त्यांच्या संसाराच्या जबाबदारीचा भार विठुराया वाहत असे. आपण मात्र दहा मिनिटं सुद्धा आपली जबाबदारी परमेश्वरावर सोपवायला तयार नसतो. देवपूजेला बसले की पूजेनंतर करायच्या कामांचा विचार माझ्या डोक्यात असतो. तेवढ्यात फोन वाजला तर कोणाचा आहे एवढे बघण्यासाठी तरी हळूच नजर फोन कडे जाते. कुकरची शिट्टी झाली तर मधेच उठून गॅस ही बंद करून येते. (पूजा झाल्यावर कुकर लावला तर काही बिघडते का) हात मात्र यांत्रिकपणे पूजा करीत असतात. सवयी नी श्लोक पण म्हटले जातात पण अवघी दहा मिनिटे पण पूजेत तल्लीन होता येत नाही. आणि मी रोज पूजा करते, वर्षानुवर्ष अमुक एक उपास करते, अधून मधून सवाष्ण, ब्राह्मण

जेवायला घालते (म्हणजेच दानधर्म करते) या सगळ्याच्या बदल्यात त्या परमेश्वरानी माझ्यावर अखंड कृपादृष्टी ठेवावी माझ्यावर आधी तर संकटेच येऊ नयेत. आणि आलीच तर परमेश्वराने मला त्यातून सहीसलामत बाहेर काढावे. अशी अपेक्षा करते. पण अगदी मनापासून एकदाही त्याला हाक मारत नाही.

चित्रांचे प्रदर्शन पहायला गेल्यावर एखादे चित्र आपल्याला खूप आवडते. आपण सहजच बोलून जातो ' खूप छान कलाकृती आहे. यामागे कलाकाराची मेहनत दिसून येत आहे ' पण त्यामागे कलाकाराची नुसती मेहनत नसते तर त्यांनी अगदी तल्लीन होऊन त्या चित्रात आपला जीव ओतलेला असतो. एखादा अभिनेता किंवा अभिनेत्री जेव्हा आपल्या भूमिकेशी एकरूप होतात तेव्हाच कसदार अभिनय लोकांना पहायला मिळतो.

मी गाणं शिकायला सुरुवात केली अगदी लता मंगेशकर किंवा आशा भोसले नाही पण गेलाबाजार सोसायटीच्या सांस्कृतिक कार्यक्रमात गाणं सादर केले सगळ्यांनी वाहवा केली. वन्स मोर सुद्धा मिळाला. लगेचच मला माझ्याही नकळत अहंकाराचा स्पर्श झाला मग आता लता मंगेशकर व्हायचे असे ठरवून व्यवस्थित

गाणं शिकायला सुरुवात केली. माझ्यामते मी मनापासून रियाज करत होते पण गुरुजींच्या काही मनास येत नव्हते. मी एवढी जीव काढून प्रॅक्टिस करते (असं मला वाटतं होतं) पण गुरुजींचे काही समाधान होत नाही काय ते स्वतःला समजतात तरी कोण? आता माझ्या अहंकाराने फणा काढला होता. गुरुजी एक दिवस म्हणाले तू गातांना मन एकाग्र कर तहान भूक विसरून तल्लीन होऊन रियाज कर. म्हणजे मग तुझ्या ताना सुरात येतील. खरंच मी गाताना तल्लीन होत होते का? प्रॅक्टिस करताना जर कधी एखादा डास चावला तर लगेच माझी नजर भिरभिरते डास शोधायला. जरा कोणी आले गेले तर चाहूल लागते आणि माझे लक्ष उडते, आणि सूर भरकटतात. तेव्हा लक्षात आले लता मंगेशकर होणे सोपे नाही. गाण्याला आयुष्य समजून तिच्यासारखी तल्लीनता साधता आली पाहिजे. गाण्याशी एकरूप होता आले पाहिजे.

सहसा आपल्याला ज्या गोष्टी करायला आवडतात तेव्हा ती गोष्ट करताना आपण तल्लीन होऊन जातो.

जनरली बायका साडी किंवा दागिने खरेदीच्या वेळी तहान भूक विसरून खरेदीत तल्लीन होऊन जातात अशावेळी त्यांना वेळेचेही भान राहत नाही. भिशी किंवा किटीपार्टी मध्ये जी मैत्रीण

अनुपस्थित असेल तिच्याबद्दल गॉसिप करताना तर बायका इतक्या तल्लीन होतात की मुलांनी मारलेली हाक पण त्यांना ऐकू येत नाही. साड्या, दागिने, गॉसिप हे बायकांचे इतके जिव्हाळ्याचे विषय असतात की त्यात तल्लीनता आपोआप साधली जाते. त्याकरता वेगळे प्रयत्न करावेच लागत नाहीत.

संत मंडळी, वैज्ञानिक, संशोधक आपआपल्या कामात तल्लीन होऊन तहान भूक विसरून ध्येयाचा पाठपुरावा करतात. शास्त्रज्ञ, वैज्ञानिक, संशोधक यांच्या अशा ध्येयवेडेपणामुळेच आज आपण वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगतीची उत्तुंग झेप घेतली आहे.

रामदास स्वामी आपल्या कार्यात आणि रामनामात तल्लीन होऊन एकरूप झाले म्हणून दासबोधा सारख्या उत्तमातील उत्तम ग्रंथाची निर्मिती झाली. भगवद्गीता संस्कृतातून मराठीत आणून सकल जनांना शहाणे करून सोडावे हे ध्येय ज्ञानेश्वर महाराजांचे होते. अपार कष्ट आणि अवहेलना सोसून सुद्धा ते आपल्या ध्येयाशी विचलित झाले नाहीत उलट कार्याशी एकरूप होऊन ठरवलेले कार्य पूर्णत्वास नेले म्हणूनच ज्ञानेश्वरी सारख्या महान ग्रंथांची निर्मिती झाली

बाबा आमटे, सिंधुताई सकपाळ, आणि अशा अनेक समाजासाठी ठामपणे उभ्या असलेल्याना आजच्या पिढीतील संत म्हणायला हरकत नाही असे वाटते. कितीही संकटे आली, अवहेलना वाट्याला आली तरी आपल्या ध्येयाप्रती निष्ठा ठेऊन घेतला वसा समर्थपणे पेलत आहेत.

म्हणून मला वाटतं आपल्याला जर एखादे काम करायचे असेल किंवा एखादे ध्येय साध्य करायचे असेल तर त्या कामावर किंवा ध्येयावर प्रथम मनापासून प्रेम असायला हवे. निष्ठा असायला हवी त्याचबरोबर त्यात यश मिळण्यासाठी झपाटल्यासारखे तल्लीन होऊन प्रयत्नांची पराकाष्ठा केली तर यश आपल्या हाती यायला वेळ लागणार नाही.

उतू नको मातू नको घेतला वसा टाकू नको. अशी ही तल्लीनतेची, तल्लीनतेने सांगीतलेली कहाणी साठा उत्तरी सुफळ संपूर्ण.

# उन्हाळा

भल्या पहाटे कोकिळेच्या गाण्याने जाग आली आणि उन्हाळा सुरु झाल्याची चाहूल लागली. शिशिर संपता संपता निसर्ग कूस वळवतो आणि वसंत ऋतूचे पहिले उबदार पाऊल अंगणात पडते. गोठवणारी थंडी जाऊन वातावरणात हवाहवासा सुखद उबदारपणा येतो. पहाटेची गुलाबी थंडी अंगभर लपेटून अनुभवण्यात काही औरच मजा असते.

खरं तर उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे तीन ऋतू . निसर्ग नियमानुसार प्रत्येक ऋतू आपल्या ठरलेल्या वेळी येतो. निसर्ग सहसा कधी आपल्या नियमाला चुकत नाही. आल्यावर साधारणपणे तीन एक महिने तरी मुक्काम करतोच. आपला हात सृष्टीवर फिरवतो आणि आपली वेळ संपली की हळुवार पावलांनी काढता पाय घेतो. आणि पुढच्या ऋतूची आपल्याला चाहूल लागते. खरं तर प्रत्येक ऋतूची आपापली वैशिष्ठ्ये आहेत. निसर्ग चक्रात प्रत्येक ऋतूचे स्वतःचे एक योगदान असते.

पावसाळ्याची चाहूल पावशा पक्षी ' पेरते व्हा ' म्हणत शेतकऱ्यांना देत आकाशात गिरक्या घेत असतो. मग पुढचे तीन महिने सगळ्यांचीच धांदल उडते. मुसळधार पाऊस सुरु होतो आणि तप्त धरणी तृप्त होते. चहूकडे हिरव्या रंगाची उधळण होते. शेतकरी सुखावतो. त्याची शेतीच्या कामाची लगबग सुरु होते. लोकांची छत्री रेनकोट सांभाळत ऑफिस गाठायची एकच धावपळ असते. घरा घरांत सणवार सुरु होतात. असा हा पावसाळा सगळ्यांनाच नवचैतन्य देतो. तरीही पावसाची रिपरिप, चिखल यामुळे आपली चिडचिड होतेच. पण तो आपले काम करून चराचर सृष्टीवर हिरवा शेला पांघरून हळूच माघारी वळतो. आणि

चाहूल लागते ती थंडीची........

छत्री रेनकोट ची जागा स्वेटर्स आणि शाली घेतात. आणि सुरु होते ती दसरा, दिवाळीची धामधूम. हळू हळू थंडीचा कडाका वाढत जातो आणि निसर्गाचे रूप पण पालटू लागते. हिरवाई जाऊन शिशिराची पानगळती सुरु होते. असे हे निसर्गचक्र वर्षानुवर्षे अव्याहतपणे विना तक्रार चालू आहे.

तुम्हाला कोणता ऋतू आवडतो असे सहज जरी कुणालाही विचारले तर बहुतेक वेळा 'हिवाळा' हेच उत्तर मिळते. जवळपास ८०% लोकांना हिवाळा आवडत असतो. १५% लोकांना पावसाळा आवडतो. आणि उरलेले ५% लोक जे काहीच उत्तर देत नाहीत त्यांना कदाचित उन्हाळा आवडत असावा असे आपण गृहीत धरायला हरकत नाही. तसा उन्हाळा फारसा कुणाला आवडतच नाही. लोक हाश्श हुश्श करत घाम पुसत सतत बिचाऱ्याला शिव्या देत असतात. त्याच्या नावाने खडे फोडत असतात. मला मात्र हिवाळा, पावसाळा तर आवडतोच पण अगदी मनापासून उन्हाळा सुद्धा आवडतो .

अहो का बरं म्हणून काय विचारता? आता तुम्हीच बघा ना, उन्हाळ्यातच आपण ट्रेंडी गॉगल्स, फॅन्सी कपड्यांची खरेदी करू शकतो आणि घालून मिरवू शकतो. पण पावसाळ्यात कपडे खराब होऊ नयेत म्हणून आपण शक्यतोवर जुनेच कपडे वापरतो, आणि कोणतेही कपडे घाला वरून रेनकोट घालावाच लागतो. आणि हिवाळ्यात स्वेटर्स आपल्या कपड्यानां झाकून टाकतात. कपड्यांचा खरा आनंद आपण उन्हाळ्यातच घेऊ शकतो. हलके कॉटनचे पांढऱ्या, गुलाबी, निळ्या रंगावर रंगीबेरंगी फुलांच्या

डिझाईनचे कुडते वॉर्डरोब मध्ये अलगद येऊन विसावतात. तर एकीकडे नवीन ट्रेंडी गॉगलची खरेदी होते.

खरं तर टीव्ही वर थंडा थंडा कूल कूल च्या जाहिराती सुरु झाल्या की उन्हाळ्याची चाहूल लागते. मग सुरु होते ती माठ खरेदीची लगबग. लाल घ्यायचा की काळा यावर चर्चा झडतात. आजकाल तर अगदी सुबक रंगीबेरंगी सुंदर डिझाइन्सचे माठ बाजारात आले आहेत. मग मनासारखी खरेदी करून माठ घरी आणला जातो. हवेशीर जागेत त्याची प्राणप्रतिष्ठा केली जाते. मग माठाच्या पाण्यात कधी मोगरा तर कधी वाळा. बस्स ssssss रणरणत्या उन्हातून घरात आल्यावर थंडगार वाळयाचे पाणी म्हणजे अहाहा ssss अगदी अमृतपानच. जीव कसा तृप्त होतो. तुमच्या फ्रिजचे किंवा कुलरचे पाणी झक मारते या पाण्या पुढे.

वातावरणात आंब्याच्या मोहोराचा हवाहवासा घमघमाट सुटतो. इकडे कोकीळ कूजन सुरु होते. पहाटेची आल्हाददायक हवा, नव्या कोवळ्या पालवीने सजलेली झाडे , लाल पिवळ्या रंगांची उधळण करत आपल्या स्वागतासाठी रस्त्यावर लाल पिवळ्या फुलांच्या पायघड्या घालून गुलमोहोर, बहावा रस्त्याच्या

कडेला आदबीने उभे असतात. मोगरा, मदनबाण, चाफा, रातराणी, मधुमालती अशी अनेक प्रकारची फुले सुवासाची उधळण करायला सज्ज होतात. वातावरण कसे सुगंधी होऊन जाते. आणि उन्हाची दाहकता कमी व्हायला मदत होते.

सगळ्यात जास्त फळे तर या ऋतूतच येतात. रामफळ, सीताफळ पासून सुरवात होते. मग कलिंगड, खरबूज, द्राक्ष, पपई ही फळे नंबर लावतात. आणि मग मोठ्या दिमाखात बाजारात दमदार, दिमाखदार एन्ट्री घेतो तो आपणा सर्वांचा अत्यंत आवडता सर्व फळांचा राजा 'आंबा. हापूस, केशर, पायरी, तोतपुरी, लंगडा किती त्याच्या त्या वेगवेगळ्या जाती आणि चवी, विचारायलाच नको. मग आमरस आणि पुरणपोळीच्या पार्ट्या अगदी रंगात येतात. शिवाय उसाचा रस, आईस्क्रीम, बर्फाचा गोळा, पन्ह आंबेडाळ आपल्या दिमतीला तत्पर असतातच. (आत्ताच सुटले ना तोंडाला पाणी)

उन्हाळा सुरु झाला म्हणजे गृहिणींची पापड कुर्डया लोणची अशी उन्हाळी कामांची गडबड उडते. मग रोज एकेकीच्या घरी जमून गप्पा टप्पा करत केंव्हाच ही कामे उरकली जातात.

(आजकाल बहुतेक ठिकाणी हे सगळे रेडिमेड आणले जाते) या दिवसात संध्याकाळी हवा फार छान असते. अंधारही लवकर पडत नाही. त्यामुळे तमाम जेष्ठ नागरिक पाय मोकळे करायला बाहेर पडतात आणि मग बागेत निवांतपणे समवयस्कांबरोबर गप्पांमध्ये रमतात. उन्हाळा म्हणजे लहान मुलांसाठी तर मोठी पर्वणीच. वार्षिक परीक्षा संपून मोठी सुट्टी लागते. अभ्यासाचे टेन्शन नसते. खेळ, ट्रिप, आणि धमाल मस्ती. आई बाबांबरोबर देश परदेशात छानशी ट्रिप. सकाळी स्विमिंग, दुपारभर सापशिडी, बुद्धिबळ, कॅरम, मुलांचा मस्त फड जमतो. आणि संध्याकाळी मैदानी खेळ. खेळू नकोस अभ्यास कर म्हणून मागे लागायला कोणी नसते. त्यामुळे समस्त विद्यार्थ्यांचा उन्हाळा हा अतिशय लाडका असतो. शिवाय आपल्या बंगल्यातल्या झाडाच्या कैऱ्यांपेक्षा शेजारच्यांच्या झाडाच्या कैऱ्या चोरून तोडण्यात वेगळीच गम्मत असते.

पटलं ना मग तुम्हाला, उन्हाळा सुद्धा मस्त असतो ते!!!!!!

खरं तर नाण्याला जशा दोन बाजू असतात तसेच कोणत्याही गोष्टीकडे बघण्याच्या दोन बाजू असतात. एक सकारात्मक आणि एक नकारात्मक. एखादी गोष्ट कितीही अवघड असो किंवा

त्रासदायक असो त्यातील सकारात्मक गोष्टी जर आपण शोधल्या आणि त्यांचा विचार केला तर अनेक अवघड गोष्टी सहज सोप्या होऊन जातात.

काय पटतंय का!!!

चला तर मग यावर्षी उन्हाळा मस्त एन्जॉय करूयात.

***HAPPY UNHALA***

# अभाव.........

अभाव - कमतरता......

खरंतर या जगात परिपूर्ण असे कोणीच नसते. प्रत्येक माणसात कशाचा न कशाचा तरी अभाव किंवा कमतरता असतेच. आपल्यात कशाचा अभाव आहे किंवा कमतरता आहे हे समजून आणि स्विकारून त्यावर खंबीरपणे मात करून किंवा त्यातून मार्ग काढून पुढे जाण्यात शहाणपणा आहे. पण सगळ्यांनाच ते जमते असे नाही. आणि ज्यांना ते जमत नाही त्यांच्याकडे आत्मविश्वासाचा पण अभाव असतो. आणि आत्मविश्वासाच्या अभावी अंगातील इतर अनेक गुणांचा योग्य वापर करून आयुष्यात यशस्वी होत नाहीत. आणि कधीकधी येणारे अपयश पचवता न आल्याने माणूस आपले मानसिक संतुलन गमावून बसण्याची शक्यता असते. काही जण मात्र आपल्यातील कमतरतेवर मात करून आपल्यातल्या गुणांच्या आधारे आयुष्यात यशस्वी होतात.

रमा जन्मतःच रंगांनी सावळी होती. तिच्या गोऱ्यापान आईने जन्मतःच तिला नाकारले होते. तिच्या समोर कायम तिच्या भावाचे कौतुक होई. चार कौतुकाचे शब्द आपल्या वाट्याला यावेत म्हणून ती जीवापाड प्रयत्न करीत असे. पण तिच्या वाट्याला मात्र

‘काळी’ 'ढ' अशी विशेषणे येत. त्यामुळे तिच्या मनात स्वतःबद्दलचा न्यूनगंड तयार झाला आणि तो न्यूनगंड मनात घेऊनच ती मोठी झाली. पण नंतर मोठेपणी जेव्हा ती बाहेरच्या जगात वावरायला लागली, तसतशा तिला गोष्टी उमजत गेल्या, समजत गेल्या. मग पुढे काही वर्षे ती रडली रडता रडता स्वतःशीच लढली आणि मग समाजात ताठ मानेने उभी राहिली. हे करताना काही नाती मागे टाकली. आज समाजात तिच्या गुणांचं कौतुक होत आहे त्यामुळे तिचा आत्मविश्वास वाढला आहे आणि ती एक छान आनंदी जीवन जगते आहे. तिच्यातल्या गुणांचा वापर करून अनेक जबाबदाऱ्या ती यशस्वीपणे पार पाडते आहे.

आपण संकट काळात परमेश्वराची आर्त विनवणी करतो पण अनेकदा तो आपल्या विनवणी ला ' ओ ' देत नाही. मग आपले विचार नास्तिकते कडे झुकू लागतात. भक्त प्रल्हाद ध्रुवबाळ किंवा संतांच्या हाकेला परमेश्वर खरंच धावून आला होता का असा प्रश्न पडतो. पण खरं तर आपल्यात भक्तीचा आणि देवावरील विश्वासाचा अभाव असतो. पण हे आपल्या लक्षातच येत नाही आणि मग त्याच्या अस्तित्वावरच आपण शंका घेऊन मोकळे होतो.

आज भारतासारख्या मोठ्या देशात स्वातंत्र्यानंतर इतक्या वर्षांनी सुद्धा अनेक मुलांच्या आयुष्यात परिस्थितीमुळे शिक्षणाचा अभाव आहे. अनेक हुशार मुले परिस्थिती अभावी उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत. आज शहरांमध्ये तसे बघितलेतर बऱ्यापैकी सुखवस्तूपणा आहे पण लोक समाधानी, आनंदी नसतात. त्यांच्या आयुष्यात कुठली ना कुठली कमतरता आणि कशाचा ना कशाचा अभाव त्यांना जाणवत असतो (अगदी आयफोन पासून ते मर्सिडीज पर्यंत) कारण आपण सतत तुलना करत असतो.

पण मी जेव्हा नर्मदालयला गेले होते तेव्हा असं लक्षात आलं की आदिवासी लोकांकडे तर अन्नधान्य, पैसे, कपडालत्ता, घरदार, शिक्षण आणि वैद्यकीय सेवा अशा सगळ्याच गोष्टींची कमतरता असूनही ही माणसं आपल्यापेक्षाही समाधानी आणि आनंदी जीवन जगतात.

काही माणसं तर आपल्यातल्या ह्या अभावालाच शिडी करून आयुष्यात वर जातात. यशस्वी होतात.

जॉनी लिव्हर ला माहिती होतं की तो कधीच हिरो बनू शकत नाही. त्याच्याकडे उत्तम व्यक्तिमत्त्वाचा अभाव होता. पण तो खचला नाही. आपल्या व्यक्तिमत्त्वाचाच त्यानी विनोद केला आणि विनोद वीर म्हणून प्रसिद्ध झाला. तर टुणटूण, निर्मिती सावंत यांनी

आपले वजन कॅश केले आणि सिनेक्षेत्रात यशस्वी झाल्या. या लोकांनी आपल्यातल्या अभावाचाच लोकांवर प्रभाव पाडला.

आता माझेच बघा ना मला प्रत्येक वेळी विनोदी अंगाने लिहावे असे वाटते पण चार ओळींनंतर पुन्हा गाडी नेहमीच्या रुळावर येते म्हणजे बहुतेक माझ्याकडे विनोदाचा अभाव असावा असे वाटते पण मी प्रयत्न करतच राहणार

शेवटी इतकेच म्हणावेसे वाटते की प्रत्येकात काहीना काही अभाव असतो पण माणूस आपल्यातला अभाव ओळखून तो कसा हँडल करतो यावर त्याच्या आयुष्यातील यशापयश अवलंबून असते.

# तारूण्य आणि नंतरचा वर्तमान........

आदित्य टीव्ही वर मॅच बघण्यात रमला होता. उद्याच्या पेपरची त्याला बहुतेक आठवण नव्हती. तेवढ्यात तारा काकू ओरडल्या. आदित्य उद्या पासून हमाली करायला जा. या पुढे तुझ्या शिक्षणावर एक पैसा ही आम्ही खर्च करणार नाही. तरुण मुले आणि त्यांचे भवितव्य म्हणल्यावर, मलमली तारूण्य माझे तू पहाटे पांघरावे किंवा तरूण आहे रात्र अजूनी ही तरूणांचे भावविश्व उलगडणारी गाणी आठवली

पण मग डोक्यात विचार आला आज स्वप्नात जगणाऱ्या या तारूण्याचे पुढचे भविष्य किंवा आणखी पुढच्या वीस वर्षांनंतरचा त्यांचा वर्तमान कसा असेल? नेहमी प्रमाणे आज तरूणपणी कष्ट केले तर पुढचा वर्तमान सुखात जाईल हे १ + १ = २ असे साधे सरळ सोपे गणित मांडून मोकळी झाले. पण या उत्तराने समाधान काही झाले नव्हते.

त्याच विचारात दुसऱ्या दिवशी सकाळी अंगण झाडत होते तर शेजारचे शेंडे आजोबा (वय वर्षे ८२) त्यांच्या अंगणात आंब्याचे कलम लावत होते. मी सहज त्यांना विचारले "आजोबा या कलमाला साधारण किती वर्षांनी फळ लागेल हो "? ते म्हणाले

लागेल साधारण ५ ते ६ वर्षांनी. का ग? "काही नाही हो सहजच विचारलं "!! पण शेंडे आजोबांनी माझ्या मनातले बरोबर ओळखले होते. ते म्हणाले वैजू तुला वाटतं असेल ना की आता लावलेल्या कलमाचे आंबे खायला हा म्हातारा जीवंत तरी रहाणार आहे का? मी ओशाळून म्हणाले "अहो नाही हो आजोबा तुम्ही अजून खूप जगणार अहात. या कलमांचे आंबे नक्की खाणार अहात.

अगं मी आता भूतकाळात जमा होत चाललो आहे. म्हणजे काय आजोबा समजले नाही. मी म्हणाले. अगं असं बघ की माणसाचे जसे वय वाढत जाते तसतसे त्याचे मागचे आयुष्य आणि त्या आयुष्यात घडलेल्या घटना या भूतकाळात जमा होत जातात. म्हणजे माणूस सुद्धा हळूहळू भूतकाळाच्या दिशेने पुढे पुढे जात असतो. कदाचित मला या कलमाचे आंबे मिळणार नाहीत पण माझ्या वर्तमान आणि भविष्याला तर नक्कीच मिळतील. अहो आजोबा पण हा 'आज' तुमचा वर्तमान आहे आणि येणारा 'उद्या' हा तुमचा भविष्यकाळ आहे ना!! मी विचारले. नाही पोरी आता माझ्या आयुष्यातले जे काही उरलेले दिवस आहेत तो माझा एकापरीने भूतकाळच आहे. असं बघ की आपण जेंव्हा कर्तृत्व गाजवतो ना तो आपला वर्तमान असतो. आणि पुढे कर्तृत्व गाजवण्यासाठी स्वतः ला घडवत असतो तो आपला भविष्यकाळ

असतो. आणि जुन्या स्वकर्तृत्वाच्या आठवणीत रमतो तो आपला भूतकाळ असतो. आज मी स्वकर्तृत्वाच्या आठवणीत रमतो. म्हणजे मी आता भूतकाळ आहे. पण माझ्या बीजातून अंकुरलेला, माझ्या अंगाखांद्यावर वाढलेला, ज्याला माझ्या संस्कारांचे खत पाणी घालून घडवला तो माझा मुलगा आज कर्तृत्व गाजवतो आहे. म्हणजे तो माझा वर्तमान आहे. तर आज आम्ही दोघे मिळून ज्याला घडवत आहोत तो माझा नातू माझं भविष्य आहे आणि माझ्या वर्तमानाचा तो उद्याचा वर्तमान आहे. (म्हणजे माझा मुलगा जेंव्हा भूतकाळाकडे जात असेल तेंव्हा त्याचा मुलगा हा त्यांचा वर्तमान असेल) आणि हसत हसत लावलेल्या कलमाला पाणी घालून तो शेंडेंच्या कुटुंबाचा भूतकाळ घरात निघून गेला. आणि मी वर्तमान, भूत, भविष्याचा गोंधळ डोक्यात घेऊन घरात आले. या सगळ्या काळाचा गोंधळ माझ्या डोक्यात खूपच गोंधळ माजवत होता. आणि अचानक वीज चमकावी तसे पाटील साहेब आठवले. पाटील साहेब म्हणजे माझा विद्यार्थी यश पाटील चे वडील. यश जेमतेम 60% मिळवून B.com झाला होता. आता त्याला MBA करायचे होते. त्याने फक्त IELTS दिली होती. त्याला GRE द्यायची नव्हती. (अर्थात तो GRE qualify पण झाला नसता.) मग त्याच्या qualification वर UK च्या एका University मध्ये त्याला admission मिळाली होती आणि आज त्याचे वडील चेक

द्यायला आले होते. मी त्यांना सहज विचारले यशला परदेशात पाठवण्याचा एवढा हट्ट का? त्याच्या मार्कांवर आणि IELTS score वर त्याला फार काही चांगली University मिळाली नाहीये. मग एवढा खर्च का? त्यावर त्यांनी फार छान उत्तर दिले.

ते म्हणाले इथे सुद्धा भरपूर पैसे मोजून त्याला MBA ला admission घ्यावी लागेल. मग अजून थोडे जास्त पैसे भरून परदेशात पाठवलं तर त्याच्याकडे परदेशी डीग्री चे स्टेट्स असेल. परदेशातून शिकून आलाय म्हणल्यावर यूनिव्हर्सिटी कोणी बघत नाहीत आणि विचारत पण नाहीत. आणि त्याला ते मिळवून देणे मला सहज शक्य आहे. असं बघा मी माझ्या आयुष्यात करिअरचा पाया रचला आहे. आणि आता उद्याचा हा माझा वर्तमान मी यशच्या रूपाने घडवतो आहे. माझ्या वडिलांची परिस्थिती नव्हती म्हणून मला पाया रचण्या पासून सुरुवात करावी लागली. पुढे यशच्या रूपाने माझा उद्याचा वर्तमान मी भूतकाळात रचलेल्या पायावर बिल्डिंग उभी करेल. आणि रचलेल्या पायावर बिल्डिंग उभी करणे जास्त सोपे असते ना!! माझ्या भूतकाळाला पाया उभा करण्यासाठी खूप कष्ट करावे लागले, त्रास सोसावा लागला

तेच कष्ट तोच त्रास माझ्या येऊ घातलेल्या वर्तमानाला पण सोसावा लागू नये, त्याला ही पुन्हा पाया घालण्यात वेळ आणि

मेहनत खर्ची घालावी लागू नये म्हणून त्याला सर्वोतपरी सहाय्य करणे हे त्याचा भूतकाळ म्हणून माझे कर्तव्य आहे.

आता हळूहळू मला दोन्ही घटनांचा संदर्भ लागत होता. तारूण्य म्हणजे, माझे मलमली तारूण्य कसे जगलो त्यावर अवलंबून असलेला माझा पुढचा वर्तमानकाळ (म्हणजे कारकूनी की गाडी, बंगला, एसी केबिन, परदेशवारी इत्यादी इत्यादी.) एवढंच नाही तर त्या तारूण्याच्या नाण्याला ही दुसरी पण एक बाजू आहे असे मला वाटते.

# विसरलेली माणसे.......

रोजच्या धकाधकीच्या जीवनात वेगवेगळ्या कारणांनी अनेक माणसे आपल्याला भेटत असतात. काही माणसे अगदी अल्पकाळा करता भेटतात. जी माणसे रोज किंवा वरचेवर भेटतात ती माणसे आपल्या नजरेसमोर असतात. पण जी माणसे पूर्वी कधीतरी भेटलेली असतात त्यांना आपण विसरत नाही फक्त त्यांची आठवण मागे पडते इतकच.

पूर्वी आम्ही जिथे राहायचो तिथे जवळच एका बंगल्यात सोनचाफ्याचे झाड होते. माझ्या रोजच्या जाण्या-येण्याच्या रस्त्यावरच तो बंगला होता. रोज जाताना मी त्या डवरलेल्या सोनचाफ्याच्या झाडाकडे आशाळभूत नजरेने पहात जायची एक तरी फूल माझ्या ओंजळीत पडावे या अपेक्षेने. त्या बंगल्यातली माणसं कधी फारशी बाहेर दिसायची नाहीत. माझी आणि त्यांची अजिबात ओळख नव्हती. एक दिवस नेहमीप्रमाणे मी त्या रस्त्यावरून जात होते तेवढ्यात त्या बंगल्यातून एक काकू बाहेर आल्या त्यांनी मला विचारले, "काय ग तुला सोनचाफा खूप आवडतो ना"? रोज आमच्या झाडाकडे बघत जातेस ती!! मी मनातून खूप घाबरले पण तेवढ्यात त्यांनी एक छोटी प्लास्टिकची

पिशवी मला दिली. ही घे असे म्हणून त्या घरात गेल्या सुद्धा. त्या पिशवीत चक्क दहा-बारा सोनचाफ्याची फुले होती. माझी तर लॉटरीच लागली होती. मग अधून मधून त्या काकू मला फुले द्यायच्या. पण हातावर फुले ठेवून त्या निघून जायच्या. आमच्यात फारसे संभाषण कधी झाले नाही. माझीही ऑफिसला जायची घाई असायची. त्यामुळे आमची ओळख कधी वाढलीच नाही. जवळपास तीनेक महिने माझ्या मनात आणि पर्स मध्ये सोनचाफा दरवळत होता. पण मग ते काका काकू घर सोडून दिल्लीला मुलाकडे गेले. आम्ही पण ती जागा सोडली. या गोष्टीला आता जवळजवळ वीस वर्ष झाली पण आजही सोनचाफा बघितला की त्या साने काकूंचा हसरा चेहरा डोळ्यासमोर येतो. एरवी रूटीनमध्ये मला कधी त्यांची आठवण येत नाही पण मनाच्या कोपऱ्यात त्या कुठेतरी असतात.

अशी काही माणसं अगदी अल्प काळ आपल्या आयुष्यात येतात पण तेवढ्या वेळात आपले आयुष्य सुगंधी करून जातात कितीही काळ लोटला तरी मनातल्या एका कोपऱ्यात त्यांची जागा पक्की असते.

मला कधीकधी मानवी मनाचे कोडे समजत नाही. बघाना!! जी माणसे लक्षात ठेवायला हवीत त्यांची क्वचित कधीतरी

प्रसंगानुरुप आठवण येते. पण ज्यांच्याशी आपले पटत नाही किंवा ज्यांनी आपल्याला त्रास दिलेला असतो अपमान केलेला असतो अशी माणसे नकारात्मक भावनेने का होईना आपल्या आठवणीत असतात. विसरायचा प्रयत्न केला तरी चटकन विसरली जात नाहीत.

विशेषतः समाजाची स्मरणशक्ती खूप छोटी असते. समाजात अनेक माणसे खूप मोठे काम करून जातात. पण समाजाला त्यांचे फार लवकर विस्मरण होते. एक हृदयरोग तज्ञ डॉक्टर नीतू मांडके. त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांची ओपन हार्ट सर्जरी केली आणि ते प्रसिद्धीच्या झोतात आले. त्या काळात ज्यांना हार्ट प्रॉब्लेम व्हायचा आणि ओपन हार्ट सर्जरी करावी लागणार असेल तर 90 टक्के लोकांना नीतू मांडके यांच्या कडूनच सर्जरी करून घ्यायची असायची. त्यासाठी सहा महिने थांबायची लोकांची तयारी असायची. लोकांना योग्य आणि वेळेवर ट्रीटमेंट मिळावी म्हणून एक स्पेशल फक्त हार्ट प्रॉब्लेम्स साठी हॉस्पिटल सुरू करण्याचे स्वप्न डॉक्टरांनी पाहिले. आणि मग स्वप्न पूर्ण करण्यासाठी जीव तोड मेहनत सुरू झाली. पण दुर्दैवाने अनेकांना जीवनदान देणाऱ्या हृदयरोग तज्ञाचा हृदय बंद पडून मृत्यू झाला

स्वप्न अर्धवट राहिलं. पुढे त्यांच्या पत्नीने डॉक्टरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी खूप प्रयत्न केला पण ते अर्धवट अवस्थेत असतानाच त्यांचाही श्वास थांबला. आज त्या जागेवर मोठं पंचतारांकित कोकिळाबेन हॉस्पिटल उभे आहे. डॉक्टर मांडके केव्हाच समाजाच्या विस्मरणात गेले आहेत. तीच गत 2008 साली मुंबईत झालेल्या गोळीबारात वीरगती प्राप्त झालेले एटीएस ऑफिसर्स हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर, तुकाराम ओंबळे समाजाच्या विस्मृतीत गेले. कोर्ट केसच्या निमित्ताने का होईना कसाब मात्र आजही लक्षात राहतो.

खरंतर अशी असंख्य विसरलेली माणसे आहेत जी देशासाठी, समाजासाठी, मानव जातीसाठी प्रचंड मोठे काम करून गेली आहेत. पण समाजाच्या मात्र विस्मृतीत गेली आहेत. समाजाने आपली आठवण ठेवावी आपला गौरव करावा अशी त्यांची अपेक्षाच नसते.

मला वाटते राम कृष्ण परशुराम यांना आपल्या पुराणांनी परमेश्वर अवताराचे रूप दिल्यामुळे आजही ते जनमानसाच्या मनामनात आहेत. पण एक कर्तबगार राजा एवढीच जर त्यांची ओळख राहिली असती तर ते सुद्धा कदाचित समाजाच्या विस्मृतीत गेले असते. समाजाने त्यांच्या जयंत्या मयंत्या साजऱ्या

केल्या असत्या आणि त्याचे राजकारण करून स्वतःच्या पोळया शेकून घेतल्या असत्या.

म्हणून एकच सांगावेसे वाटते की चांगली कर्तबगार माणसे विस्मरणात जाऊ देऊ नका तर त्यांचा आदर्श समोर ठेऊन कार्य करत रहावे.

# निरोप कसला घेता माझा....

खरेतर कुणाचाही निरोप घेणे ही एक क्लेशकारक एक घटना असते. निरोप घेणे अशक्य होते म्हणून सीतेने रामाबरोबर वनवास पत्करला. रमाबाई तर श्रीमंत माधवराव पेशव्यांबरोबर सती गेल्या. बरेचदा निरोप हा नाईलाजानेच घ्यावा लागतो.

लग्न होऊन सासरी जाणाऱ्या मुलीला निरोप देताना मुलीची आणि तिच्या आई-वडिलांच्या मनाची होणारी घालमेल बघून तर कुणाच्याही डोळ्यात पाणी येते. आकाशी झेप घे रे पाखरा सोडी सोन्याचा पिंजरा असे आपण म्हणतो पण मुले उच्च शिक्षणासाठी किंवा नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने घर सोडतात तेव्हा माहिती असते की यातच त्यांचे भले आहे तरीही निरोप देताना अंत:करण जड होतेच!!

घरात एखादे कार्य असेल तर मोठ्या हौसेने आणि आनंदाने ते उभे केले जाते त्यासाठी दिवस-रात्र खपून खूप मोठी तयारी केली जाते. तेव्हा जी दगदग होत असते, कष्ट होत असतात तेव्हा वाटते की कधी एकदा हे संपेल. पण एकदा का कार्याचे सूप वाजले की मात्र मन उदास होते. मनाला एक वेगळीच हुरहुर लागते. कार्य संपल्यामुळे आलेले रिकामपण नकोसे वाटते. दुसरे काहीतरी

व्यवधान मिळेपर्यंत मन त्या कार्यातील घटनांमध्येच रुंजी घालत असते. दुसरे व्यवधान मिळाले की हळूहळू पहिल्या घटनेच्या आठवणी मागे पडत जातात. आणि मग कधीतरी प्रसंगानुरूप पुन्हा आठवतात. पण तेव्हा त्या तेवढ्या त्रासदायक नसतात. जसे गणपती विसर्जनानंतर मनात एक वेगळीच हुरहूर दाटून येते. पण मग नवरात्र सुरू झाले की ही हुरहूर संपते आणि नव्या उत्साहाने घट बसवणे फुलोरा श्री सूक्त कुंकुमार्चन या गोष्टींमध्ये मन रमून जाते. दसरा झाला की देवीला निरोप देताना तो लावलेला अखंड दिवा काढताना मनात उदासी दाटून येते. पण लवकरच दिवाळीच्या रोषणाईत मन नव्याने उजळून निघते.

निरोप घेणे हे जरी क्लेशकारक असले तरी काही वेळा समोरची व्यक्ती कधी एकदा निरोप घेईल असे पण होते बरं का!! त्याचे असे झाले की एक दिवस रात्री साधारण जेवायच्या वेळी बेल वाजली. दारात एक अनोळखी बाई उभी होती. मग तिने कुणाच्या रेफरन्सने आणि काय कामाकरता आली आहे हे सांगितले. मग तिला घरात बोलावून बसा म्हटले तर ती म्हणाली, "नाही बसत नाही खूप काम पडलंय रात्र वैऱ्याची आहे." मला वाटलं ही बाई काय पाच मिनिटात जाईल. तिला माझ्याकडची लोकर हवी होती. मी तिला ती आणून दिली पण मग मी कसं काम करते मला कसे अनुभव येतात असे म्हणत तिने जो गप्पांचा फड उभा केला की

बस. माझी गाडी काही हूं, हो, बरोबर आहे, खरं आहे याच्यापुढे गेली नाही. घरात सगळे तीच्या जाण्याची वाट बघत होते. सगळ्यांनाच भुका लागल्या होत्या आणि जेवणाची वेळ होऊन जात होती. दर दहा वाक्यां नंतर ती म्हणायची खूप काम आहे रात्रभर बसून मान पाठ एक करावी लागणार आहे. करता करता शेवटी एक तासाने तिने निरोप घेतला पण जाताना लोकर घरातच विसरली. लोकर द्यायला मी धावत बाहेर गेले तर बिल्डिंगच्या गेटपाशी पुन्हा तिच्या गप्पा रंगल्या. शेवटी पंधरा मिनिटांनी तिचा निरोप घेऊन मी वर आले तर घरातल्यांची जेवणे संपली होती. आणि सगळे मला हसत होते. म्हणत होते की गप्पा ऐकून तुझे पोट भरले असेल आता जेवायची गरजच नाही तुला. अशी ही सगळी एका निरोपाची गंमत

पण खरंच कधीकधी नको असलेल्या व्यक्ती नको त्या वेळी समोर आल्या तर त्यांना टाळायचे कसे किंवा लवकरात लवकर निरोप घेऊन कटवायचे कसे हाच विचार प्रथम मनात येतो.

पण काही निरोप मात्र मनाला हुरहुर लागली तरी आनंद देणारे असतात. एक दिवस सकाळी नेहमीप्रमाणे उठल्यावर मी दार उघडून टेरेस वर आले. तर एक छोटासा पक्षी भिंतीच्या आडोशाला बसलेला दिसला. माझी चाहूल लागल्यावर सुद्धा तो उडाला नाही.

मी थोडी जवळ गेले तर तो आणखीनच अंग चोरून बसला. मग माझ्या लक्षात आले की त्याच्या एका पायाला आणि पंखाला दुखापत झाली होती. बिचाऱ्याला उडता येत नव्हते. तो कसाबसा घाबरून सरपटत होता. मग मी घरातून एक रिकामे खोके आणले. त्यात माझी जुनी कॉटनची ओढणी अंथरली. खोक्याचे वरचे झाकण काढून टाकले आणि तो खोका उभा ठेवला म्हणजे तो पक्षी सरपटत त्या खोक्यात जाऊ शकेल. आणि मग एका प्लेटमध्ये पाणी आणि एका प्लेटमध्ये बाजरी आणि तांदुळाचे दाणे ठेवले. मग बराच वेळ मी बाहेर गेले नाही. खूप वाटत होते जाऊन बघावे पक्षी काय करतोय ते. पण कदाचित माझी चाहूल लागल्यावर तो घाबरला असता. मग दुपारी हळूच जाऊन बघितले तर पक्षी खोक्यात निवांत झोपला होता. मला खूप आनंद झाला. मग पुढे रोज त्याला पाणी आणि दाणे ठेवणे, त्याची हालचाल बघणे, प्रगती किती होते आहे ते बघणे हे एक कामच झाले. हळूहळू त्याला पण माझी सवय झाली. आता तो माझी चाहूल लागली की घाबरत नव्हता. त्याची जखम बरी होत होती. तो टेरेसवर थोड्या थोड्या उड्या मारू लागला. थोडा उडायचा प्रयत्न करू लागला. असे जवळजवळ आठ दिवस गेले. आता तो पक्षी माझा जिवलग बनला होता.


आणि एक दिवस सवयीने त्याला पहायला टेरेस वर गेले तर महाराज ऐटीत टेरेसच्या कठड्यावर बसले होते. एकदा चौफेर नजर फिरवली आणि क्षणात आकाशात उंच झेप घेतली. जणू माझा निरोप घेण्यासाठी तो कठड्यावर बसून माझी वाट पाहत होतो. त्याला उंच आकाशात उडताना पाहून माझ्या डोळ्यात आनंदाने पाणीच आले. अर्थात पुढे काही दिवस टेरेस वर गेले की नकळत नजर त्या रिकाम्या खोक्या कडे जायची आणि मग तीच नजर वर आकाशात पक्षी शोधायची.


अरेच्या!!! खूप जास्त मोठा लिहिलं का!!! आता मात्र निरोप घेते हं!!!!!!!!!

अच्छा भेटू पुन्हा.

वैजयंती डांगे यांनी लिहीलेली व ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े प्रकाशित झालेली पुस्तके (कव्हरवर क्लिक करताच उघडतील)



## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष
## वैजयंती डांगे यांचे ईसाहित्यवरचे हे चौथे पुस्तक.

वैजयंती डांगे या ई साहित्यच्या ऑडिओ विभागातील उत्कृष्ट अभिवाचक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या भावपुर्ण व स्पष्ट आवाजातील पुस्तके ही लोकांना आवडतात. त्यांचे लेखन मुख्यत्वे स्त्रीच्या भावविश्वातील कंगोरे टिपणारे आहे. आणि स्त्रियांच्या प्रश्नांचे मूळ व्यापक समाजिक प्रश्नांमधेच आहे याचे त्यांना भान आहे, त्यामुळे इतर विषयांवर त्या आत्मियतेने लिहीतात. त्या हे सर्व लेखन व अभिवाचन स्वांतःसुखाय करतात आणि त्यातून त्यांना पैसे तर सोडाच पण प्रसिद्धीचीही लालसा नसते.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३३), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे

महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१६), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(४) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), वैजयंती डांगे(४) श्याम कुलकर्णी, किशोर कुलकर्णी, रामदास खरे, अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत.

त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।